
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा०वा०
दा. क्र. ५६३०



IRBK-0105630
IRBK-0105630

# छोटा भाई

शरच्चंद्र चटर्जी

अभिनव प्रकाशन, मुंबई १२

५६३०

डॉ. शरच्चंद्र चटर्जी

# छोटा भाई

[रामेर सुमति]

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 30727
दिनांक
क्रमांक २८३४
सं. दि.
वाचनालय शाखा

अनुवादक

मामा वरेरकर

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ...५६३० नों दि ...
वि. ...

अभिनव प्रकाशन, मुंबई १२.

IRBK-0105630

# प्रस्तावना

'रामेर सुमति' ही कथा 'यमुना' मासिकांत जानेवारी, फेब्रुवारी, १९१२ सालीं प्रसिद्ध झाली होती. पुढें ती 'बिंदूर छेले' आणि 'पथनिर्देश' या दोन कथांसह पुस्तकरूपानें १९१४ सालीं प्रसिद्ध झाली.

या कथेवर आधारून श्री. देवनारायण गुप्त यांनीं लिहिलेलें नाटक ता. २२ जून १९४४ रोजीं रंगमहल नाटकगृहांत अभिनीत झालें होतें. प्रस्तुत नाटकांत लेखकानें मूळ कथेपेक्षां बरेच फेरफार केलेले होते. तरीही रंगभूमीवर तें बरेंच लोकप्रिय झालें होतें.

प्रस्तुत कथा म्हणजे एक साधीसुधी घरगुती गोष्ट आहे. शरद्बाबूंच्या इतर लेखनाच्या दृष्टीनें पहातां, ही गोष्ट पुष्कळशी आरंभकालांतच लिहिली गेली असली तरी कलात्मक वास्तव लिखाणाच्या दृष्टीनें अत्यंत आकर्षक झालेली आहे. 'बिंदूचें बाळ' आणि प्रस्तुत गोष्ट या दोहोंच्या कथावस्तूंत वात्सल्याच्या दृष्टीनें एक प्रकारचें साम्य असलें तरी कथावस्तूला कारण झालेल्या राम आणि अमूल्य या दोन मूळ भूमिकांच्या दृष्टीनें पहातां हें साम्य हिशेबांत घेण्याजोगें नाहीं. बंगाली स्त्रीमनाची जी एक विशिष्ट घडण दाखवायचा बंकीमबाबूंप्रमाणेंच शरद्बाबूंनींही प्रयत्न केला आहे तिचाच पुरावा 'नारायणी' च्या निर्मितींत सांपडेल. सकृद्दर्शनीं बिंदू आणि नारायणी या दोन्ही भूमिका अवास्तव आहेत असें अतिचिकित्सक टीकाकाराला वाटणें अशक्य नाहीं. ओढ रक्ताची असते, पिंडाची असते कीं सहवासानें उत्पन्न झालेल्या वात्सल्याची असते याचा निर्णय या भूमिकांतून करण्याचा शरद्बाबूंनीं यशस्वी प्रयत्न केला आहे. वात्सल्याच्या उत्पत्तीला नातेंगोतें जसें कारणीभूत होत नाहीं, तसेंच तें आडही येत नाहीं. प्रेमाच्या उगमाप्रमाणेंच वात्सल्याचा उगम कसा होतो हें निश्चितपणें केव्हांही सांगतां येणार नाहीं. प्रेम आणि वात्सल्य या दोन्ही भावनांत जें एक साम्य आहे—नव्हे, वात्सल्यांतूनच प्रेमाचा उगम होतो, त्याचप्रमाणें प्रेमाची परिणतीही वात्सल्यांतच होते असा जो एक भारतीय संकल्प आहे त्याचें प्रतीक या कथेंत उत्तम रीतीनें दिसून येतें.

सर्वसामान्य मराठी कथावाङ्मयांत अशा विशिष्ट आणि सकृद्दर्शनीं अवास्तव दिसणाऱ्या कथा क्वचितच सांपडतील. सर्वसाधारण व्यावहारीक समजांवर या कथावस्तूनें जो आघात केला आहे तो विद्याभ्यासजड बुद्धिवाद्याला सहसा पटणार नाहीं, हेंच या कथेचें वैशिष्ट्य आहे.

या कथेवर आधारलेला चित्रपट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. आणि तो या कथेवरील नाटकाइतकाच किंबहुना त्याहूनही लोकप्रिय झाला आहे. शरद्बाबूंच्या लहानमोठ्या कथांवर बरेचसे चित्रपट निघाले आहेत, पण हरीभाऊ आपटे यांच्यासारख्या अधिष्ठित लेखकांच्या कथांची अजूनही महाराष्ट्रीय चित्रपट निर्मात्यांकडून उपेक्षा होत आहे हें पाहिलें म्हणजे बंगाल आणि महाराष्ट्र या प्रांतांतील चित्रपटनिर्मात्यांच्या मनोभूमिकेंतील फरक ध्यानांत येऊन दुःख वाटल्यावांचून राहात नाहीं.

हाजी कासमवाडी,
फ्रेंच ब्रिज, मुंबई ७.
१ जून १९४९.

मामा वरेरकर

द्वितीयावृत्ति
नोव्हेंबर १९५६

# छोटा भाई

## [ रामेर सुमति ]

१

रामचें वय कमी होतें पण दुष्टबुद्धि मात्र कमी नव्हती. गांवचे सारे लोक त्याला भीत असत. तो कसा, कुठून, कोणत्या प्रकारें अत्याचार करील त्याचा अंदाज कुणालाच करतां येत नसे.

श्यामलाल हा त्याचा मोठा भाऊ. तो सावत्र भाऊ होता. तो अगदींच शांतस्वभावी होता असें नव्हे, पण लहानशा अपराधासाठीं तो कधींही जबर शिक्षा करीत नसे. गांवच्या जमीदाराच्या कचेरींत तो नोकर होता. आणि त्याचवेळीं तो स्वतःच्या जमीनजुमल्याचीही व्यवस्था पहात असे.

त्यांची परिस्थिति एकंदरींत सुखासमाधानाची होती. घरदार, वतंनवाडी, बागबगीचा, तलाव, दहावीस घरें, कुणबी रयत आणि कांहीं नगद पैसाही होता. श्यामलालची बायको नारायणी पहिल्यानें या घरीं आली त्याला आज तेरा वर्षें होऊन गेलीं होती. त्याच वर्षीं रामची विधवा आई मरण पावली. मरतांना तिनें आपला अडीच वर्षांचा राम आणि संसाराचा भलामोठा पसारा तेरा वर्षांची सूनबाई नारायणी हिच्या हातीं सुपूर्द केला.

त्या वर्षीं गांवांत तापाची साथ मोठ्या जोरांत होती. नारायणीला देखील तापानें पछाडलें होतें. त्या गांवासकट आजूबाजूच्या तीनचार गांवांत डिग्रीवाला डॉक्टर एकच होता. त्याचें नांव नीलमणी सरकार. साथीमुळें त्याची फी एक रुपयावरून दोन रुपयांवर गेली. क्विनाईनमध्यें आरारूटचें पीठ मिसळून तो रोग्यांना देत होता.

सात दिवस झाले तरी नारायणीचा ताप कमी होईना. श्यामलाल काळजींत पडला. घरची मोलकरीण नृत्यकाली डॉक्टरला बोलवायला गेली होती, ती परत येऊन म्हणाली, “ आज त्यांना वेगवेगळ्या तीन गांवांत जायचं आहे. तिथं फी मिळणार आहे चार रुपये, तेव्हां त्यांना येतां येत नाहीं.”

श्यामलाल रागारागानें म्हणाला, " तसंच असेल तर मी सुद्धां चार रुपये देईन. पैसा आधीं कीं माणसाचा जीव आधीं ? तूं जा आणि त्या म्हार-ड्याला बोलावून आण ! "

नारायणीनें आंतून तें भाषण ऐकलें. ओढल्या आवाजानें हांक मारून ती म्हणाली, "ऐकलं का, एव्हढी उतावळी कशाला करतांहां ? डॉक्टर उद्यां येईल. एक दिवसानं असं काय मोठंसं बिघडतंय ? "

रामलाल पडवीच्या पलीकडे पेरूच्या झाडाखालीं बसून पक्ष्याचा पिंजरा तयार करीत होता. तो तिथून उठून आला आणि म्हणाला, " तूं थांब नेत्ति, मीच जातों. "

दीराची हांक ऐकून नारायणी घाबऱ्याघुबऱ्या उठून बसली आणि म्हणाली, "अहो, त्या रामलालला जाऊं देऊं नका. अरे राम, माझी शपथ आहे तुला. जाऊं नकोस. माझा बाळ तो ! छी छी दादा, झगडा करूं नकोस उगीच ! "

तिचें भाषण कानीं न घेतां राम जायला निघाला. त्याचा पांच वर्षांचा पुतण्या पिंजऱ्याच्या काठ्या धरून बसला होता तो म्हणाला, " पिंजरा नाहीं का बांधायचा काका ? "

" बांधूं सावकाश. " असें म्हणून राम चालता झाला.

नारायणीनें कपाळावर हात मारून घेतला. ती रडकुंडीला येऊन नवऱ्याला म्हणाली, " कां तुम्ही त्याला जाऊं दिलं ? आतां पहा, काय भानगड करून येतो तें पहा. "

श्यामलालला राग आला होता. तो तिरसटून म्हणाला, " मी काय करणार ? त्यानं तुझं ऐकलं नाहीं, तो काय माझं ऐकणार आहे ? "

" हात कां धरला नाहींत त्याचा ? या दळभद्रयाच्यापायीं एक घडीची सुद्धां उसंत मिळत नाहीं मला. नेत्ति ! माझी बाई ती ! अशी उभी राहूं नकोस. भोलाला पाठवून दे. अजून तो गुरं घेऊन गेला नसेल कुरणांत. दादापुता करून रामला समजावून परत आण म्हणावं. "

नृत्यकाली भोलाचा तपास करण्यासाटीं निघाली.

नीलमणी डॉक्टरच्या घरीं येऊन राम हजर झाला. डॉक्टर त्यावेळीं दवाखान्यांत होते. एका मोडक्या कपाटाच्या शेजारच्या मोडक्या टेबलासमोर ते

हातीं ताजवा घेऊन औषधें वजन करीत होते. चार पांच रोगी 'आ' वासून त्यांच्याकडे पहात राहिले होते. डॉक्टरनीं आडनजरेनें एकदां रामकडे पाहिलें आणि आपल्या कामाकडे लक्ष लावलें.

एक मिनिटभर वाट पाहून राम म्हणाला, "वहिनीचा ताप अजून कां निघत नाहीं ?"

ताजव्यावर नजर टेवून डॉक्टर म्हणाले, "मी काय करूं ? औषध देतोंय—"

"मातीमसण देतां ! सडक्या पिठानं काय रोग बरा होतोय ?"

त्याचें तें भाषण ऐकून नीलमणी डाक्टर वजनें, ताजवा वगैरे बाजूला ठेवून हे एव्हढाले डोळे करून त्याच्याकडे पाहूं लागले. त्यांच्या तोंडून शब्द निघत नव्हता. आपल्यापुढें कुणीही असे आचरट उद्गार काढण्याचें धाडस करील अशी त्यांची कल्पना नव्हती.

क्षणभर पाहून ते रागारागानें ओरडून म्हणाले, "मग सडलेलं पीठ घेऊन जायला येतोस कशाला रे ? तुझा दादा पायपडणीला येऊन कशाला रे बोलावणं पाठवतो मला ?"

राम म्हणाला, "दुसरा डॉक्टरच नाहीं इथं; म्हणून बोलावतो. असता कुणी तर बोलावलं नसतं."

तिथें बसलेले लोक स्तंभित झाले होते. त्यांच्याकडे एकदां नजर फेंकून राम पुन्हां म्हणाला, "हलकटच कीं नाहीं तूं ! ब्राह्मणाचा मान कसा ठेवावा हें कळत नाहीं तुला, म्हणून पायपडणीला येऊन बोलावतात म्हणून म्हटलंस ! दादा नाहीं कुणाचे पाय धरायचे. येतांना वहिनीनं गळ्याची शपथ घातली म्हणून—नाहींतर तुझे सारे दांत पाडून मग गेलों असतों घरीं. ऐकलंस ? चांगलं औषध घेऊन आत्तांच्याआत्तां ये. वेळ लावूं नकोस. आज जर ताप निघाला नाहीं तर हीं समोरची आंब्याचीं कलमं दिसताहेत ना तुझीं, अजून नीटशीं वाढलेलीं नाहींत, कुदळ घेऊन सारीं एका झटक्यासरशीं जमीनदोस्त करून टाकीन. आजच्या रात्रींत एक सुद्धां झाड शिल्लक राहायचं नाहीं इथं. अन् उद्यां सकाळीं येऊन या तुझ्या साऱ्या बाटल्या ब्रिटल्यांचा चुराडा करून टाकीन—कळलं ?" असें म्हणून तो तडक बाहेर निघून गेला.

हातांत ताजवा तसाच घेऊन डॉक्टर ताठ होऊन बसले होते.

तिथें बसलेला एक म्हातारा माणूस धीर करून म्हणाला, "आतां एव्हढासुद्धां विलंब लावूं नका डॉक्टरबाबू. चांगलींशीं औषधं कुठं लपवून छपवून ठेवलीं असतील तीं बाहेर काढून घेऊन जा. त्या राम ठाकूरशीं गांठ आहे. बोललेला शब्द खरा केल्याशिवाय तो मुळींच राह्यचा नाहीं."

हातांतला ताजवा खालीं ठेवून डॉक्टर म्हणाले, "मी ठाण्यावर जाऊन दरोग्याला वर्दी देतों. तुम्ही सारे साक्षी आहांत."

ज्या म्हाताऱ्यानें हा सल्ला दिला होता तो म्हणाला, "साक्षी! कोण देईल बाबू! रोजरोज कोयनेल खाऊन कानाला बसलेयत दडे. राम ठाकूर काय बोलला तें आम्हांला ऐकूंच आलं नाहीं मुळीं. आणि दरोगा तरी काय करणार आहे बाबू? हा बामण दिसतोय लहान पण त्याचं एक टोळकं आहे कुणब्यांचं, तें मात्र लहान नाहीं. कुणाच्या घराला आग घालून घराची राख-रांगोळी झाली तरी ठाण्यावरचे लोक चौकशीला नाहीं यायचे. दरोगाबाबू एक गवताची काडीसुद्धां उचलायचे नाहींत कीं मदतीला यायचे नाहींत. हें असलं कांहीं व्हायचं नाहीं आमच्याकडून. सारे लोक त्याला थरकांप भीतात. तो जें आतां कांहीं सांगून गेलाय तें मुकाट्यानं ऐका. आतां एकदां माझी नाडी बघा पाहूं. दोन रोट्या खाऊं का आज?"

डॉक्टर आंतल्याआंत भडकून उठले होते. म्हाताऱ्यानें नाडी पहा असें म्हटलें त्यावेळीं ते उसळून उठून म्हणाले, "साक्ष देणार नाहीं तुम्ही? मग चालते व्हा पाहूं इथून. कुणाचीच नाडी पहाणार नाहीं मी! मेलेत तरी कुणाला औषध देणार नाहीं! पहातों आतां तुमचं कसं होतं तें!"

हातीं काठी घेऊन म्हातारा उभा राहिला आणि म्हणाला, "यांत कुणाचीच चूक नाहीं डॉक्टरबाबू. तो मोठा सैतान आहे. त्या बामणाला जाऊन एकदां सांगून यायला हवं. नाहीं तर ठाण्यावर जायचा सल्ला आम्हींच दिला असा समज व्हायचा त्याचा. बिघाभर जमिनींत वांग्याचे रोप लावलेयत, चांगले वाढून आलेयत, ते सारे रात्रींच्या रात्रींत उपटून काढून फेंकून देईल. त्याचं तें टोळकं सारी रात्र जागत असतं. ऐकलंत बाबू, ठाण्यावर वर्दी द्यायला जायचं असलं तर मग केव्हांतरी जा, पण आधीं चांगलंसं औषध

घेऊन त्याच्या घरीं जाऊन त्याला थंडा करून या.”

म्हातारा निघून गेला असें पाहून जे कुणी तिथें होतें तेही एकामागून एक निघून गेले. नीलमणी डॉक्टरनें एक मोठा सुस्कारा सोडला. मानवी जीवनांतील अगदीं शेवटच्या ज्ञानामुळें या जगांत जी कांहीं उत्तमांतील उत्तम जाणीव होत असते आणि त्यामुळें जो उद्गार निघत असतो तोच उद्गार त्यांच्या तोंडून निघाला,—“या दुनियेंत कुणाचं बरं करूं नये हेंच खरं!”

डॉक्टर घरांत निघून गेले.

वाटेकडे नजर लावून नारायणी खिडकीकडे पहात होती. तिचा जीव खालींवर झाला होता. राम घरीं आला आणि पुतण्याला हांक मारून म्हणाला, “गोविंद, चल हा पिंजरा धर ये.”

नारायणीनें हांक मारली, “अरे राम, जरा इकडे ये पाहूं.”

कात्रीनें काठी तोडीत–तोडीत राम म्हणाला, “एव्हां नाहीं. मी कामांत आहें.”

नारायणी त्याला धमकावून म्हणाली, “आधीं इकडे ये म्हणतें ना!”

हातांतली काठी खालीं ठेवून राम उठला आणि वहिनीच्या खोलींत जाऊन तिच्या माच्याच्या पायथ्याशीं जाऊन बसला. नारायणीनें विचारलें, “डॉक्टर भेटले का?”

“हो.”

“काय सांगितलंस त्यांना?”

“यायला सांगितलं.”

नारायणीला तें त्याचें उत्तर पटलें नाहीं. ती म्हणाली, “नुसतं ‘या’ म्हणून सांगितलंस–अधिक कांहीं बोलला नाहींस ना?

रामनें यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं.

नारायणी म्हणाली, “बोल ना. काय बोललास त्यांना?”

“सांगणार नाहीं.”

नृत्यकाली आंत आली आणि तिनें डॉक्टर येत आहेत म्हणून वर्दी दिली.

अंगावर पासोडी ओढून घेऊन नारायणी पाठ फिरवून झोंपी गेली. रामनें तिथून एकदम पाय काढला. थोड्याच वेळांत डॉक्टरना बरोबर घेऊन

श्यामलाल आंत आला. तपासणी वगैरे करून डॉक्टर शेवटीं नारायणीला उद्देशून म्हणाले, "असं पहा सूनबाई, ताप निघणं न निघणं काय डॉक्टरच्या हातीं आहे ? तुझ्या दीरानं मला दोन दिवसांची मुदत दिली आहे. तितक्यांत तूं बरी झाली नाहींस तर तो माझ्या घरादाराला आग घालणार आहे."

नारायणी शरमेनें मेल्याहून मेल्यासारखी झाली. ती म्हणाली, "तो काय तोंडाला येईल तें बोलतो. आपण कांहीं काळजी करूं नका. कांहीं भ्यायला नको."

डॉक्टर म्हणाले, "लोक सांगतात, त्याचं एक टोळकं आहे, तो जें बोलतो तें करून दाखवतो, म्हणूनच मला मोठी शंका वाटतेय. औषध देणें आमच्या हातीं आहे. कुणाला जगवणं कांहीं आमच्या हातीं नाहीं."

नारायणी आपल्याशींच पुटपुटली, "हा कारटा एक दिवशीं खास तुरुंगांत जाणार. अगदीं खात्री आहे माझी. पण त्याच्याबरोबर मलासुद्धां तुरुंगांत जावं लागणार कीं काय तोच विचार पडलाय मला !"

आज नीलमणी डॉक्टरनें आपल्या झोंपायच्या खोलींतल्या संदुकींतून अस्सल क्विनाईन आणि खात्रीचीं औषधें काढून बरोबर आणलीं होतीं. तीं दिलीं तेव्हां श्यामलालनें त्याच्या हातीं व्हिजिटचे चार रुपये ठेवले. ते पाहून जीभ चावून डॉक्टर म्हणाले, "छे छे, हें काय ? माझी व्हिजिट फी आहे केवळ एक रुपया. त्यापेक्षां अधिक घेतां येत नाहीं मला. तसली संवय नाहीं मला. असं पहा श्यामबाबू, पैसा आहे दोन दिवसांचा, पण धर्म सदासर्वदाचा."

दोनच दिवसांपूर्वीं त्यानीं व्हिजिट फीचा आणखी एक रुपया घेतला होता ही गोष्ट आतां त्यांच्या आठवणींतून गेली होती. पण श्यामलालला मात्र या साऱ्या भानगडीची आपोआप उकल झाली होती.

कांहीं कां होईना, नारायणी लौकरच बरी होऊन उठली आणि पूर्ववत् आपल्या संसाराच्या कामाला लागली.

: २ :

एकदोन महिन्यांनंतर एके दिवशीं नारायणी नदीवर स्नान करून भरलेली घागर घेऊन घरीं आली. घागर ठेवून ती म्हणाली, "नेत्ती, तें माकड कुठं गेलं ?" माकड म्हणजे कोण तें घरच्या साऱ्याच माणसांना माहित होतें.

नेत्ति म्हणाली, "छोटेबाबू आत्तांच इथं होते. ते बघा—त्या तिकडे पतंग तयार करताहेत."

तो दृष्टीला पडतांच नारायणीनें त्याला हांक मारून म्हटलें, "इकडे ये दळभद्र्या, आधीं इकडे ये. या तुझ्या चाळ्यापायीं मी आतां गळ्याला फांस लावून का घेऊं ?"

आडव्याउभ्या काठींत वाकवलेली काठी अडकवीत रामलाल जवळ आला आणि उभा राहिला.

नारायणी म्हणाली, "सात्रांच्या मांडवावरचा काकडीचा वेल कां कापून टाकलास ?"

"त्यानीं पाह्यलंय का मला कापतांना ?"

"त्यांनीं नाहीं पाह्यलं–मी पाह्यलंय. कां कापलास सांग ?"

"त्या थेरडीनं माझा अपमान कां केला ?"

नारायणी संतापून उठून म्हणाली, "अपमानाची गोष्ट राहूं दे. तूं चोरी कां केलीस तें आधीं सांग."

नित्याप्रमाणें रामलालनें आश्चर्य प्रदर्शित केलें. तो रागाला येऊन म्हणाला, "चोरी केली ? मुळींच नाहीं ! एव्हढीशी कांकडी काढून घेतली म्हणजे चोरी झाली होय ?"

नारायणी अधिकच भडकून म्हणाली, "होय रे मेल्या माकडा, ती चोरीच. हजार झालं तरी चोरीच ! म्हाताऱ्यापासून एव्हढ्याशा पोरापर्यंत चोरी म्हणजे काय तें सर्वांना कळतं. आतां उभा राहा एक पायावर. पाजी कुठला ! उभा राहा म्हणतें ना !"

त्या घरांत लहानांत लहान होता काय तो गोविंद. तो होता रामचा हुंडीबाग. चोवीस तास तो त्याच्याबरोबर असे आणि प्रत्येक कामांत त्याला हातभार लावीत असे. रामच्या हुकमाप्रमाणें हा वेळपर्यंत तो पतंग घेऊन बसला होता. इकडे गडबड चाललेली ऐकतांच पतंग टाकून तो आपल्या आईपाशीं येऊन उभा राहिला.

राम कांकू करतो आहे असें पाहून तो चट्कन म्हणाला, "काका, राहा ना एक पायावर–हा असा–" असें म्हणून त्यानें एक पाय वर उचलून उभें राहाण्याचें प्रात्यक्षिक त्याला दाखवून दिलें.

रामनें थाड्कन त्याच्या एक थोबाडींत लगावली आणि लगेच मागें फिरून तो एका पायावर उभा राहिला.

विभाग ........ नों. दि. ........ वाचनालय शाखा

नारायणीला हंसूं येत होतें तें आवरून मुलाला कडेवर घेऊन ती सैंपाक-घरांत गेली.

चारदोन मिनिटांनीं ती परत येऊन पहाते तों राम तसाच एका पायावर उभा होता. धोतराच्या सोग्यानें डोळे चोळचोळून पुशीत होता.

नारायणी म्हणाली, " बरं बरं, जा आतां. झालं तें झालं. यापुढं असं कांहीं करूं नकोस. "

तिचें बोलणें रामनें ऐकून घेतलें नाहीं. रागारागानें तसाच एक पायावर उभा राहून तो जोरजोरानें डोळे पुशीत होता. नारायणी त्याच्याजवळ गेली आणि त्याचा हात धरून ओढूं लागली, तेव्हां तो हट्टानें ताठरून तसाच उभा राहिला आणि जोर करून त्यानें तिचा हात झाडून टाकला.

ती हंसली. पुन्हां एकदां त्याला ओढायचा तिनें प्रयत्न केला त्यावेळीं पूर्वींप्रमाणेंच तिचा हात झिडकारून स्वतःला सोडवून घेऊन तो तडक पळत सुटला.

घटकाभऱ्यानें नृत्यकाली त्याला शोधीत आली. पहाते तों चंडीमंडपाच्या ओटीवर भिंतीला टेंकून पाय झुलवीत तो चुपचाप बसला होता.

नृत्यकाली म्हणाली, " शाळेची वेळ झाली नाहीं का छोटेबाबू ? बाई बोलावताहेत. " रामनें हूं कीं चूं केलें नाहीं. जणूं कांहीं आपल्या कानीं कांहींच आलें नाहीं अशा रीतीनें तो तसाच बसून राहिला.

नेत्ति समोर आली आणि म्हणाली, " बाईनीं तुम्हांला लौकर स्नान करून जेवायला यायला सांगितलंय. "

राम डोळे गरगर फिरवीत ओरडून म्हणाला, " तूं नीघ पाहूं इथून. "

" पण बाईनीं काय सांगितलं तें ऐकलंत ना ? "

" नाहीं—कांहीं नाहीं ऐकलं मी. मी न्हाणार नाहीं, जेवणार नाहीं, कांहींसुद्धां करणार नाहीं. तूं जा पाहूं इथून. "

" मी जाऊन सांगतें त्यांना. " असें म्हणून नृत्यकाली जायला निघत होती.

राम एकदम उठला आणि खिडकीजवळच्या डबक्यांत त्यानें एकदम बुडी मारली. भिजल्या माथ्यानें आणि भिजल्या कपड्यांनीं तो तसाच येऊन बसून राहिला.

तें कळतांच नारायणी कळवळून धांवतच आली. ती म्हणाली, " अरे मेल्या समंधा ! काय केलंस हें ? त्या डबक्यांत कुणी पायसुद्धां धुवायला भीतात, त्यांत बुडी मारून आलास होय ? "

तिनें आपल्या पदरानें त्याचें माथें पुसलें आणि कपडे बदलून घेऊन त्याला आंत आणलें. समोर वाढलेलें ताट होतें. पण तें तसेंच पुढ्यांत घेऊन राम फुरंगटून बसला होता.

नारायणीला त्याचा उद्देश कळला. ती जवळ आली आणि त्याच्या माथ्यावरून हात फिरवीत म्हणाली, " माझा शहाणा बाळ तो ! एव्हढा वेळ आतां आपल्या हातानं जेव. रात्रीं मी भरवीन तुला. पाहिलंस ना, अजून माझा सैंपाक झालेला नाहीं. हं, कर सुरवात जेवायला. शहाणा बाळ तो ! "

रामनें कसेंबसें जेवण उरकलें आणि कपडे करून तो शाळेंत गेला.

नृत्यकाली म्हणाली, " तुमच्या या लाडांपायींच त्याला ही अशी वाईट खोड लागलीय बाई ! एव्हढ्या मोठ्या वाढलेल्या मुलाला पोटाशीं धरून भरवायला हवंय कशाला ? जरा रागं भरलांत कीं जेवायला लागेल आपोआप ! त्याची कशाला एव्हढी पत्रास ? "

नारायणी उगीच थोडीशी हंसली आणि म्हणाली, " नाहींतर जेवीत नाहीं ना तो ! रात्रींची लालूच दाखवली नसती तर अस्साच प्रहरभर फत्कल मारून बसला असता, पण जेवला नसता. "

नृत्यकाली म्हणाली, " हो—जेवला नसता म्हणे ! भूक लागली कीं जेवील आपोआप. एव्हढा मोठा मुलगा—"

नारायणीला तिचें तें भाषण आवडलें नाहीं. ती म्हणाली, " तूं नुसतं त्याचं वय पहातेस ! जरा मोठा झाला, थोडीशी अक्कल आली, कीं त्याची त्यालाच लाज वाटूं लागेल. तेव्हां मग पोटाशीं तरी कशाला धर म्हणेल अन् भरवायला तरी कशाला सांगेल ? "

नृत्यकाली रुसल्यासारखी झाली. ती म्हणाली, " बऱ्याची गोष्ट म्हणून मी बोललें बाई, नाहींतर मला काय जरूर बोलायची ? बारा तेरा वर्षं झालीं तरी ज्याला अक्कल येत नाहीं, त्याला ती येणार तरी केव्हां ? "

आतां मात्र नारायणीला राग आला. ती म्हणाली, " साऱ्यांना कांहीं एकाच वेळीं अक्कल येत नाहीं नेत्ति. कुणाला चार दोन वर्षं आधीं, तर कुणाला चार दोन वर्षं नंतर. आणखीन् असं पहा, तो बरा होवो कीं वाईट होवो, त्याची उठाठेव तुला कशाला ? "

नेत्ति म्हणाली, " ही तुमचीच चूक आहे बाई. उठल्यासुटल्या हा कसा दुष्टपणा करतोय, तें तुम्हीं स्वतः बघतांहां. गांवचीं सारीं लोकं म्हणतात, कीं तुमच्याच लाडांमुळं हा—"

नारायणी चिरडीला येऊन म्हणाली, " गांवचीं लोकं नुसतीं लाड करतें तेव्हढं पहातात—शिक्षा कशी लावतें तें नाहीं पहात. पण तूं कांहीं गांवची लोक नव्हेस ! पारभर कसा एक पायावर उभा राहून रडत होता—डबक्यांतल्या पाण्यांत कशी त्यानं बुडी मारली—देव जाणें आतां ताप येईल कीं काय होईल तें !–अशा वेळीं त्याला उपासपोटीं शाळेला पाठवून देऊं म्हणतेस होय? घरचा अन् बाहेरचा हा एव्हढा असा छळ माझ्यानं नाहीं सोसवायचा नेत्ति. "

बोलत असतांना तिचा गळा दाटून आला. तिचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले होते ते तिनें पदरानें पुसले. याच प्रकरणीं गेल्या रात्रीं नवऱ्याबरोबर तिचें थोडेंसें भांडण झालें होतें, ती गोष्ट नृत्यकालीला माहित नव्हती. ती भारीच ओशाळली आणि मनाला लावून घेऊन म्हणाली, " हें काय बाई, अशा रडतां कां ? मी वाईट वाटेल असं कांहींच बोललें नाहीं. लोक म्हणतात म्हणून थोडासा इशारा दिला एव्हढंच. "

नारायणी डोळे पुसून म्हणाली, " सारींच माणसं ईश्वर कांहीं सारखींच घडवीत नसतो. तो थोडासा व्रात्य आहे म्हणून ज्यांचीं त्यांचीं बोलणीं मी मुकाट्यानं ऐकून घेतें. पण मी लाड करतें म्हणून या लोकांनीं टोमणा कां मारावा ? त्यांना हवंय तरी काय ? त्याचे तुकडे करून मी नदींत सोडून द्यावे असं का त्यांचं म्हणणं आहे ? तसं केलं तरी देखील त्यांचं कांहीं समाधान व्हायचं नाहीं. " एव्हढेंच बोलून तिच्या उत्तराची अपेक्षा न करतां ती तांतडीनें निघून गेली.

नृत्यकाली अगदीं एव्हढीशी होऊन गेली. ती आपल्याशींच म्हणाली, " काय सांगायचं बाई ! साऱ्या गोष्टींत ज्या माणसाला सारं कांहीं कळतं—एव्हढी ही धीराची बायको—तिला एव्हढंच कसं कळत नाहीं ? अन् शिक्षा

तरी अशी काय मोठी केली ! पोर एक पायावर उभा राहून रडला म्हणून पृथ्वी कांहीं रसातळाला जात नाहीं !"

दादाच्या पंक्तीला बसायची रामला कधींच आवड नव्हती. आज रात्रीं नारायणीनें मुद्दामच दोघां भावांची ताटें शेजारीं शेजारीं मांडलीं होतीं. ती जवळच बसली होती. राम आंत आला आणि एकदम भडकून म्हणाला, "चल ! मी नाहीं जेवीत—मुळींच जेवायचा नाहीं मी."

नारायणी म्हणाली, "तर मग जा जाऊन झोंप."

तिचा आवाज असा चढलेला पाहून रामचा भडका एकदम थंडावला. तरीही तो जेवायला बसला नाहीं. तो तसाच कांहीं न बोलतां उभा राहिला होता.

सैंपाकघराच्या दुसऱ्या बाजूच्या दरवाज्यानें श्यामलाल आंत आला त्यासरशीं वावटळीसारखा तो बाहेर निघून गेला. श्यामलाल शांतपणें जेवायला बसला. तो म्हणाला, "राम्या जेवला नाहीं का ?"

नारायणी एकच शब्दांत म्हणाली, "तो जेवील माझ्याबरोबर."

जेवण उरकून श्यामलाल बाहेर गेला न गेला तोंच राम मूठभर राखाडी घेऊन आंत आला आणि म्हणाला, "मी कुणाला सुद्धां जेवूं देणार नाहीं. सर्वांच्या पानांत आतां ही राखाडी घालणार !—घालूं ?"

नारायणी वर पाहून म्हणाली, "घालून एकदां मजा तर पहा !"

राम राखेची मूठ तशीच पुढें करून सूर बदलून म्हणाला, "भारीच मजा ! सकाळीं मला फसवून जेवायला लावलंस, अन् आतां म्हणे मजा तर पहा !"

"तूं जेवलास कां ?"

"तूं म्हटलंस, कीं रात्रीं—"

"एव्हढा वाढलेला घोडा तूं, दुसऱ्याकडून भरवून घ्यायला लाज नाहीं वाटत तुला ?"

राम अचंबून म्हणाला, "दुसऱ्याच्या हातून कसं ? तूंच तर स्वत: म्हटलंस !"

नारायणीनें अधिक वाद घातला नाहीं. ती म्हणाली, "बरं आतां जा. ती राखाडी फेंकून हात धुवून ये. पण यापुढं तुला भरवायला हवं असलं तर—"

जेवण उरकलें नव्हतें. कांहीं कारण नसतां नृत्यकाली उगीच एकदां दरवाजासमोर येऊन आंत डोकावून पाहून पलीकडल्या ओटीवर निघून गेली.

तें पाहून नारायणी म्हणाली, "राम, कधीं सुद्धां तूं ताळ्यावर यायचा नाहींस का रे बाबा? देव तुला एव्हढी तरी सुबुद्धि कधीं नाहीं का द्यायचा? लोकांचीं बोलणीं आतां नाहीं माझ्याच्यानं सहन करवत!"

तोंडांतला घांस गिळून राम म्हणाला, "कोण लोक? नांवं सांग पाहूं त्यांचीं."

नारायणी एक सुस्कारा सोडून म्हणाली, "छान! कोण लोक त्यांचीं नावं तुला सांगूं होय?"

एक दोन महिन्यांनंतर मात्र गोष्टी नारायणीच्या सहनशक्तीपलीकडे गेल्या. तिची विधवा आई दिगंबरी, आपली दहा वर्षांची मुलगी सुरधुनी हिच्यासह इतके दिवस भावाच्या घरीं कसेबसे दिवस काढीत होती. तिचा तो भाऊ एकाएकीं मरण पावल्यामुळें तिला आधाराला कुठेंच जागा राहिली नाहींशी झाली. नवऱ्याची परवानगी घेऊन नारायणीनें त्यांना आणायला माणसें पाठवलीं.

तीं दोघेंही आलीं. आल्याबरोबर दिगंबरीनें मुलीवर तर अधिकार गाजवायला सुरवात केलीच, पण त्याच जोरावर रामवर देखील ती आपला जोरा चालवायला पाहूं लागली.

पहिल्यापासून रामवर तिचा डोळा होता. त्या दिवशीं सकाळीं राम एक चार हात लांबीची पिंपळाची फांदी आणून ती आंगणांतच रोवायला सुरवात करीत होता. सैंपाकघराच्या उंबरठ्यावर बसून दिगंबरी माळ फिरवीत फिरवीत तें सारें पहात होती. ती त्याला दरडावून म्हणाली, "हें काय चाललंय रे राम?"

तिच्याकडे पाहून राम म्हणाला, "हें पिंपळाचं झाड मोठं झालं, कीं आंगणांत छान सावली होईल. आमचे मास्तर म्हणत होते कीं पिंपळाची सावली फार छान. गोविंद, कळशी भरून पाणी घेऊन ये पाहूं. भोला, एक मोठासा कळक तोडून आण पाहूं. याच्या सभोंवार कुंपण घातलं पाहिजे—नाहीं तर गुरंवासरं खाऊन टाकतील."

दिगंबरीचीं हाडें जळून-पिचून निघालीं. ती म्हणाली, "अंगणाच्या मध्यभागीं काय कुणी पिंपळाचं झाड लावतात? असली मुलखावेगळी करणी कांहीं आम्ही बापजन्मीं देखील बघितली नाहीं बाबा!"

रामनें तिच्या बोलण्याकडे लक्षसुद्धां दिलें नाहीं.

गोविंद आपल्या शक्तीप्रमाणें एक लहानसा तांब्या पाण्यानें भरून घेऊन हजर झाला. त्याच्या हातचा तांब्या घेऊन राम मोठ्या ममतेनें त्याला म्हणाला, "एव्हढ्याशा पाण्यानं काय होणार आहे रे? तूं जरा इथंच उभा राहा. मी पाणी घेऊन येतों."

त्यानंतर कळशा भरभरून पाणी आणून रामनें साऱ्या अंगणांत चिखल करून टाकला. पालापाचोळा काढून टाकून राम मोकळा होत आहे तोंच नारायणी नदीवरून स्नान करून घरीं आली. हा वेळपर्यंत दिगंबरी ज्वालामुखी-सारखी धुमसत होती. अगदां तिच्या नजरेसमोर हे भलेमोठे उपद्व्याप सुरू होऊन आतां पुरे सुद्धां झाले होते. मुलगी आलेली दिसतांक्षणींच ती मोठ्यानें ओरडून म्हणाली, "पहा नारायणी, चांगले डोळे उघडून पहा. तुझ्या दीरानं कसे गुण पाघळलेयत ते पहा—पिंपळाची फांदी आणून आंगणाच्या मधोमध रोवलीय—काय तर म्हणे सावली होईल चांगली—अन् तिकडे पहा, तो हरामजादा भोला काय भानगड करतोय ती पहा. भलामोठा कळक तोडून घेऊन येतोय—त्या फांदीभोंवतीं कुंपण घालणार आहे म्हणे!"

नारायणीनें मागें वळून पाहिलें—खरोखरच भोला एक भलामोठा कळक तोडून त्याचे तुकडे करून आणून ओटीवर ठेवीत होता. भोला रामच्याच वयाचा होता.

नारायणी हंसूं लागली. इकडे तिची आई कावून भडकली होती—अन् तिकडे रामचा तो वेडगळ उपद्व्याप सुरू होता. तो सारा प्रकार पाहून तिला हसूं आवरेना. तशीच हंसतहंसत ती म्हणाली, "आंगणाच्या मधोमध पिंपळ कशाला पुरलास रे तो?"

राम आश्चर्यचकित होऊन म्हणाला, "कशाला म्हणजे काय वहिनी, किती छान सावली पडेल साऱ्या आंगणभर! अन् याची छोटी फांदी दिसतेय

ना, ती मोठी झाली कीं नाहीं, म्हणजे—हां, गोविंद, बोट दाखवूं नकोस!—ती मोठी झाली कीं नाहीं म्हणजे गोविंदसाठीं एक झोंपाळा बांधणार आहे तिच्यावर. भोला, कुंपण घालशील तें जरा उंचच घाल हं. नाहींतर कपिला आली कीं मान लांब करून सारं खाऊन टाकील—दे, ती कोयती इकडे माझ्याकडे दे. तुला जमायचं नाहीं तें!"

खट्खट्, ठक्ठक् करीत कळक तोडायचें काम सुरू झालें. नारायणी हंसतहंसत कडेवरची घागर सैपाकघरांत नेऊन ठेवण्यासाठीं निघून गेली.

संतापानें दिगंबरीच्या आंगाचा भडका झाला होता. एव्हढाले डोळे वटारून गुलीकडे पहात ती म्हणाली, "तूं कांहींसुद्धां बोलली नाहींस त्याला. म्हणजे इथं हें पिंपळाचं झाड रोवलेलं चालेल तुला?"

नारायणी हंसून म्हणाली, "एव्हढी चिडीला कशाला येतेस आई? एव्हढी मोटी फांदी कधीं रुजते का? तें काय एव्हढंसं रोपटं आहे, कीं तें घडाभर पाणी घालून जगणार आहे? उद्यांच्या उद्यां वाळून जाईल तें."

दिगंबरीचें कांहीं केल्या समाधान झालें नाहीं. ती म्हणाली, "वाळेल नाहीं तर जळेल. बऱ्या बोलानं तें उपटून टाक पाहूं आधीं."

नारायणी घाबरून म्हणाली, "अग बाईग? मग कांहीं निस्तार लागेल का कुणाचा?"

दिगंबरी म्हणाली, "कां? आंगणाच्या अगदीं मधोमध पिंपळाचं झाड आणून रोवायला हें घर काय त्याचं एकट्याचंच आहे? तूं काय कुणीच नाहींस? माझा गोविंद म्हणजे कुणीच नव्हे का? अग बये, पिंपळाचं झाड झालं तर साऱ्या गांवच्या कावळे चिमण्या, वाघळं, घारी अन् घुबडं तिथं बिऱ्हाड मांडतील अन् साऱ्या गांवांतलीं उष्टीं हाडं आणून टाकतील आंगणांत. सारं आंगण विटाळून टाकतील. तसं कांहीं झालं तर मी नाहीं ग बाई इथं रहायची. एवढ्याशा पोराला एव्हढं भ्यायचं कशाला? हें घर माझं असतं नारायणी, तर कसा याचा वात्यपणा टिकतो तें पाहूलं असतं मी! एका दिवसांत सुतासारखा सरळ आणला असता."

आईच्या अंतरंगांतला उद्देश आरशांतल्या प्रतिबिंबासारखा नारायणीला स्पष्ट दिसून आला. एक क्षणभर थांबून बळेंच हंसूं आणून ती म्हणाली, “पोराची जात! एव्हां त्याची अक्कल ती अशी काय असायची आई? तेव्हढी अक्कल असती तर आपल्या घराच्या आंगणांत कुणी पिंपळांचं झाड लावलं असतं का? दोन दिवस स्वस्थ राहा. मग तोच आपण होऊन झाड काढून टाकतो कीं नाहीं तें पहा.”

दिगंबरी म्हणाली, “तो काढून टाकतोय! तोच कशाला, मीच उपटून टाकून देतें.”

नारायणी म्हणाली, “नाहीं बरं आई, तसं कांहीं करूं नकोस–तुला सांगून ठेवतें–त्याला तूं ओळखत नाहींस. एक माझ्याखेरीज त्याच्या वडील भावालासुद्धां तिथं हात लावायची छाती व्हायची नाहीं. आई, आजचा दिवस स्वस्थ रहा.”

दिगंबरी तिरसटून म्हणाली, “बरं बरं. तूं आधीं ओलेतं सोडून कोरडं नेस जा.”

दुपारच्या वेळीं नारायणी आपल्या खोलींत बसून उशीचे अभ्रे शिवीत होती. इतक्यांत नृत्यकाली धांवतच आली आणि म्हणाली, “सत्यानाश झाला बाई! तुमच्या आईनीं छोटेबाबूंचं झाड उपटून काढून फेकून दिलं. आतां ते शाळेंतून आले कीं मग कांहीं कुणाची धडगत नाहीं!”

हातचें शिलाईकाम फेंकून देऊन नारायणी धांवतच बाहेर आली. पहाते तों तिथें फांदी नव्हती. तिनें विचारलें, “रामचं झाड काय झालं आई?”

दिगंबरी चंबूसारखें तोंड करून बोट दाखवून म्हणाली, “तें पहा.”

नारायणी जवळ जाऊन पहाते तों तिला दिसून आलें, कीं ती फांदी नुसती उपटूनच टाकली नव्हती, तोडूनमोडून तिचा चोळामोळा करून टाकण्यांत आला होता. ते सारे तुकडे गोळा करून मुकाट्यानें दूर फेंकून देऊन नारायणी परत आपल्या खोलींत आली.

शाळेंतून आल्याबरोबर राम आधीं गेला तो आपल्या झाडाकडे. तिथें झाड नाहीं असें पहातांच तो भडकला. पाटीपुस्तकें, दप्तर फेंकून देऊन तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, “माझं झाड काय झालं वहिनी?”

नारायणी सैंपाकघरांत होती ती बाहेर आली आणि म्हणाली, " सांगतें—आधीं इकडे ये. "

" नाहीं—मी नाहीं येत. काय झालं माझं झाड ? "

" इकडे ये म्हणतें ना. "

राम जवळ येतांक्षणींच तिनें त्याचा हात धरून त्याला आपल्या खोलींत नेलें. त्याला जवळ बसवून घेऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवीत ती म्हणाली, " मंगळवारीं कधीं कुणी पिंपळाचं झाड लावतात का रे ? "

राम एकदम थंडावला आणि म्हणाला, " कां ? काय होतं लावलं तर ? "

नारायणी हंसून म्हणाली, " तसं लावलं तर घरची मोठी सून मरते ना ! "

रामचा चेहरा उतरला. तो म्हणाला, " चल ! खोटं बोलतेस ! "

नारायणी हंसतमुखानें म्हणाली, " नाहीं रे, मुळींच खोटं बोलत नाहीं मी. पंचांगांतच लिहिलंय तसं. "

" कुठं ? पंचांग दे पाहूं. "

नारायणीला मोठा पेंच पडला. ती एकदम आश्चर्यचकित झाल्याचा आव आणून म्हणाली, " कसला रे मुलगा तूं ! मंगळवारीं पंचांगाला हात लावतात का कुणी ? कसं पहाणार आहेस पंचांग ? त्या भोल्याला सुद्धां माहित आहे. बोलाव त्याला आणि विचार हवं तर. "

आपलें हें अज्ञान भोलाच्यासमोर उघडकीस आलें तर आपली फजीती होईल असें वाटून तो ओशाळला. आपल्या आईसारख्या मोठ्या वहिनीच्या गळ्याभोंवतीं आपले दोन्ही हात टाकून तिला कवटाळून धरून तो म्हणाला, " मला सुद्धां माहित आहे तें. पण उपटून काढून फेंकून दिलं कीं मग कांहीं दोष नाहीं—होय ना वहिनी ? "

नारायणी त्याला हृदयाशीं कवटाळून धरून म्हणाली, " नाहीं बरं, मग कांहीं दोष नाहीं—" तिचे दोन्ही डोळे भरून आले होते. तिनें हळूच विचारलें, " काय रे राम, मी मेलें तर तूं काय करशील ? "

राम जोरजोरानें मान हलवीत म्हणाला, " चल, असलं कांहीं बोलूं नकोस. "

नारायणीनें त्याला दिसूं न देतां आपले डोळे पुसून घेतले आणि म्हटलें, " आतां मी झालें म्हातारी. आतां मरणारच मीं. "

तिची ती थट्टा आतां रामच्या ध्यानीं आली. तो वर पाहून हंसतहंसत म्हणाला, " तूं म्हातारी का ? एक दांत पडला नाहीं कीं एक केंस सुद्धां पिकला नाहीं ! "

नारायणी म्हणाली, " केंस पिकायच्या पूर्वींच मी एक दिवस जाऊन नदींत जीव देणार आहें. आंघोळीला म्हणून जाईन ती परत यायचीच नाहीं मुळीं. "

" कां वहिनी ? "

" तुझ्या या त्रासामुळं. माझी आई तुझ्या डोळ्यांत सलते. रात्रंदिवस तूं तिच्याबरोबर झगडा करतोस. मी एकदां गेलें अन् परत नाहीं आलें म्हणजे त्या दिवशीं कळेल तुला. "

तिचें तें बोलणें रामला खरें वाटलें नाहीं. तरीही तो साशंक होऊन म्हणाला, " बरं बरं. यापुढं नाहीं कांहीं बोलणार. पण ती कां मला अशी टाकून बोलते ? "

" बोलेना कां ? ती आई आहे ना माझी ? तुझी देखील वडील माणूसच आहे ना ती ? जशी माझी माया करतोस तशीच तिचीही माया करशील ना ? "

रामनें पुन्हां वहिनीच्या कुशींत तोंड खुपसलें. गेलीं तेरा वर्षे इथेंच तोंड राखून तो वाढला होता. निखालस खोटें बोलणें त्याच्याकडून झालें नसतें. होय कसें म्हणावें याचा त्याला पेंच पडला.

नारायणी गहिंवरून म्हणाली, " तोंड लपवून काय होणार आहे रे बाबा ? "

अगदीं याचवेळीं दिगंबरी येऊन तिथें हजर झाली. वाणींत शक्य तितका गोडवा आणून ती म्हणाली, " तुला कांहीं काम नाहीं का नारायणी ? दीराला घेऊन त्याचे लाड करीत बसलीयस आणि तिकडे तुझा स्वतःचा मुलगा सुकून जातोय. "

रामनें चट्कन वर नजर करून पाहिलें. त्याच्या नजरेंत हिंस्र पशूचा क्रूरपणा जळजळून उठला होता.

नारायणीनें बळेंबळेंच त्याचें तोंड हृदयाशीं कवटाळून धरून आईला म्हटलें, " मुलगा सुकून जायला काय झालंय ?"

" काय झालंय ? छान !" एव्हढेंच बोलून दिगंबरी निघून गेली. कांहींतरी बनाव करून एखादी खोटी थाप द्यायला तिला शब्द सुचले नाहींत.

राम बळेंबळेंच तिच्या कवेंतून तोंड बाहेर काढून घेऊन म्हणाला, " या जखणीचा एक दिवस मी गळा दाबणार !"

नारायणी त्याच्या तोंडावर हात ठेवून म्हणाली, " चूप रहा गाढवा. आई आहे ना ती ?"

चार दिवसांनंतर एके दिवशीं राम जेवायला बसला होता, तो ऊः आः करूं लागला. दोनचार वेळ घटाघट पाणी पिऊन घेतल्यावर भाताची थाळी उडवून देऊन तो उभा राहून थयथयाट करूं लागला,—" या थेरड्या जखणीच्या हातचं मी कांहींसुद्धां खायचा नाहीं—अगदीं कध्धीं कध्धीं नाहीं. मिरचीनं माझं तोंड पोळून गेलं कीं ग वहिनी! अग ए वहिनी !"

त्याची ओरड एकून नारायणी पूजा टाकून धांवतच आली. ती म्हणाली, " काय झालं रे ?"

रागाच्या भरात रामला रडें कोसळलें. तो म्हणाला, " कध्धीं जेवायचा नाहीं हिच्या हातचं—कध्धीं कध्धीं नाहीं ! हिला घालवून दे इथून."

बोलत बोलत वावटळीसारखा तो बाहेर निघून गेला.

नारायणी सुन्न होऊन बराच वेळपर्यंत उभी राहिली होती. ती म्हणाली, " आई, तुला पुन्हां पुन्हां सांगितलं, कीं भाजींत इतकी मिरची घालूं नकोस. एव्हढं तिखट खायची या घरच्या कुणालाच संवय नाहीं."

दिगंबरी एकदम भडकली आणि म्हणाली, " कसलं तिखट आलंय ? दोन मिरच्या मोडून टाकल्या तर त्याचा हा एव्हढा थयथयाट !"

नारायणी नाराज होऊन म्हणाली, " नाहीं टाकल्यास दोन मिरच्या तर काय बिघडलं ? कुणी कधीं कांहीं हातच लावीत नाहींत त्याला—"

" गप्प राहा नारायणी, गप्प राहा. बोलूं नकोस. सैंपाकाचे धडे मला

नकोत द्यायला. काळ्याचे पांढरे झाले माझे सैंपाक करतांना. आतां पोटची पोरगी सैंपाक शिकवायला येतेय मला ! आग लागो माझ्या जिण्याला !"

नारायणी यावर कांहीं बोलली नाहीं. सैंपाकघरांत जाऊन ती पुन्हां सैंपाक करायच्या तयारीला लागली.

दिगंबरी दारांत फतकल मारून बसून थडाथड कपाळावर हात मारून घेऊं लागली. मोठमोठ्यानें रडत विव्हळत ती म्हणत होती, "भाऊराया रे ! कुठं आहेस तिथं मला घेऊन जा एकदांची ! आतां हें सहन होत नाहीं मला. तोंडाला येईल तें बोलून मला शिवीगाळ करताहेत रे ! मी थेरडी ! मी जखीण ! मला घालवून दिलं पाहिजे घरांतून ! गळफांस घ्यायला दोरी मिळत नाहीं म्हणून या असल्या मुलीजावयाच्या घरीं शितं चिवडीत बसायचं आलंय माझ्या कपाळीं ! यापेक्षां दारोदार भीक मागत फिरणं हजारपटीनं बरं. सुरू, चल पोरी, आपण आतां जाऊं. यापुढं या घरांत तोंडांत पाणीसुद्धां घ्यायचं नाहीं."

सुरधुनी रडकुंडीला आली होती. ती येऊन आईजवळ उभी राहिली. दिगंबरी तिचा हात धरून जायला निघाली होती.

उघडलेली विळी उलटी करून ठेवून नारायणी धांवतच आली. तिनें रस्ता अडवून धरला तेव्हां दिगंबरी रडत रडत म्हणाली, "नको—आम्हांला अडवून धरूं नकोस नारायणी. आतां जाऊं दे. उपासपोटीं झाडाखालीं पडून मेलों तरी बेहेत्तर पण तुमच्या घरचं अन्न नको. तुझ्या छपराखालीं राहाणं नको."

नारायणी हात जोडून म्हणाली, "कुणाच्या रागानं जातेयस आई ? काय गुन्हा केलाय आम्ही तुझा ?"

दिगंबरीचें रडणें अधिकाधिक वाढूं लागलें. ती हेल काढून म्हणाली, "मी कांहीं अगदींच कुक्कुबाळ नाहीं नारायणी. सर्व कळतंय मला. तुझी फूस असल्याशिवाय का त्याला एवढा धीर होतो तो ? मी जखीण का ? आं ! मला घालवून द्यायचं ना घरांतून ? बरं आहे, जातें मीं. तुम्हां लोकांना संकट झालों आहों आम्ही !—गळ्यांतलीं लोढणीं !—रस्ता सोड म्हणतें ना !"

नारायणीनें आईचे दोन्ही पाय धरले आणि म्हटलें, "आजच्यापुरती सबूर कर. मला क्षमा कर. ते घरीं येऊं देत, मग काय तुला वाटेल तें कर—" असे म्हणून तिनें तिचा हात धरून तिला ओढीत नेलें, तिच्या पायावर पाणी

घातलें आणि तिचे पाय आपल्या पदरानें पुसून तिला ओटीवर बसवून घेऊन ती पंख्यानें वारा घालूं लागली.

तेव्हढ्या वेळापुरता तिचा राग शांत झाला खरा, पण दुपारच्या वेळीं श्यामलाल जेवायला बसला आहे असें पाहून ती दाराआड उभी राहून स्फुंद-स्फुंदून रडूं लागली. हें पाहून श्यामलाल पहिल्यानें हतबुद्ध होऊन नुसता पहात राहिला. नंतर हळूहळू सारी हकिकत त्याला सांगितली गेली त्यावेळीं जेवण अर्धेंच टाकून तो उठून गेला.

हा राग त्यानें कुणावर काढला होता त्याची नारायणीला कल्पना आली होती. नृत्यकालीला मात्र तें सहन झालें नाहीं. त्या घरांत तीच काय ती एक स्पष्ट बोलणारी होती. ती सरळसरळ बोलून गेली, " आजीबाई, कळून सवरून तुम्ही बाबूंना अर्ध्या जेवणांतून उठवलं ! तुमच्या डोळ्यांतलं पाणी कांहीं एव्हांच सुकून जात नव्हतं. दोन मिनिटं थांबलां असतां तर कांहीं बिघडलं नसतं. पुन्हां पाणी आलं असतं हवं तर ! "

दिगंबरी एव्हढेंसें तोंड करून निरुत्तर होऊन बसली होती. दुपारच्यावेळीं राम कुठून तरी चक्कर मारून आला. या खोलींतून त्या खोलींत शोधीतशोधीत तो वहिनीच्या खोलींत आला. पहातो तों गोविंदाला जवळ घेऊन ती झोंपी गेली होती. एकंदरींत हवा बिघडली आहे असें त्याला वाटलें. तरीही तो हळूच म्हणाला, " भूक लागली आहे ग ! "

वहिनी कांहीं बोलली नाहीं.

तो थोडासा जोर करून म्हणाला, " काय ठेवलंयस माझ्यासाटीं ? काय खाऊं ? "

नारायणी पडल्यापडल्याच म्हणाली, " मला नाहीं माहित. नीघ इथून."

" नाहीं. मी नाहीं जाणार. आम्हांला भूक लागत नाहीं वाटतं ? "

नारायणीनें तोंड फिरवलें आणि रागारागानें म्हटलें, " उगीच मला त्रास देऊं नकोस राम. नेत्ति आहे तिकडे, तिला सांग जा. "

अधिक कांहीं न बोलतां राम बाहेर आला आणि नृत्यकालीला शोधून काढून म्हणाला, " मला खायला दे नेत्ति. "

तिनें आधींच तयारी करून ठेवली होती. एक वाटी दूध, थोडेसे पोहे आणि चारपांच खोबऱ्याचे लाडू तिनें आणून त्याला दिले.

राम रागारागानें म्हणाला, “ एव्हढंच आहे वाटतं ? ”

नेत्ति म्हणाली, “ छोटेबाबू, बऱ्या बोलानं ऐकायचं असेल तर उगीच दंगा करूं नका. बाबू जेवल्याशिवाय कचेरींत गेले. बाई गोविंदला घेऊन उपासपोटीं पडून राह्यल्यायत. तुमची गडबड ऐकून जर त्या आल्या, तर मात्र मग तुमची धडगत नाहीं. सांगून ठेवतें. ”

राम स्वतःच तें पाहून आला होता. अधिक कांहीं न बोलतां त्यानें थोडेंसें दूध घेतलें. पोहे आणि लाडू ओचांत बांधून घेऊन तळ्याच्या पाळीवर एका झाडाखालीं तो जाऊन बसला. त्याचें खाण्यावरचें मन उडालें होतें. वहिनी उपाशी होती. मन कुठेंतरी भटकत असतांना पोहे चावीतचावीत तो आपल्याशींच विचार करीत होता : पूर्वींच्या ऋषिमुनींप्रमाणें आपल्याला एखादा मंत्र माहित असता, तर इथेंच बसल्याबसल्या आपण वहिनीच्या पोटाची भर केली असती. पण तसा कोणताही मंत्र माहित नसल्यामुळें कोणता उपाय केला म्हणजे काय होईल तें त्याला नीटसें ठरवतां येईना.

पुन्हां घरीं जाऊन तिला जेवायचा आग्रह करायलाही त्याला लाज वाटत होती. शिवाय दादाही जेवले नव्हते ! आग्रह केला तरी काय उपयोग होता ! ओचांतले पोहे, लाडू पाण्यांत टाकून तो उठला आणि इकडे तिकडे फिरूं लागला. एकच गोष्ट सारखी त्याच्या मनाला डांचत होती—वहिनी आज उपाशी आहे ! पुन्हां पुन्हां तो जसजसा हेंच वाक्य आपल्याशींच उच्चारूं लागला, तसतशी त्याच्या मनाची टोंचणीही अधिकाधिक वाढूं लागली.

रात्रींच्या वेळीं श्यामलाल आपल्या बायकोला म्हणाला, “ आतां यापुढं मला हें सहन व्हायचं नाहीं. याला घेऊन घरीं राहणं आतां निभायचं नाहीं. ”

नारायणीनें चकित होऊन विचारलें, “ कुणाची गोष्ट बोलतांहां ? ”

“ रामची. तुझ्या आईनं गेले चार पांच दिवस सारखा माझा पाठपुरावा केलाय—राम नाहक सारखा तिचा अपमान करतोय. आतां गांवचे चार लोक गोळा करून इस्टेटीची वांटणी करायची अन् त्याला वेगळा ठेवायचा असं मी ठरवलंय. आतां मला हें निभत नाहीं. ”

कांहींवेळपर्यंत नारायणी सुन्न होऊन बसून राहिली होती. ती म्हणाली, "रामला वेगळा ठेवायचा? असलं कांहीं बोलूं नका! एव्हढंसं पोर तें, इस्टेट घेऊन तो काय करणार आहे—सांगा ना?"

श्यामलाल तोंड वेंगाडून म्हणाला, "एवढंसं पोर म्हणे! अन् इस्टेट घेऊन तो काय करणार आहे म्हणे! तें त्याचं त्याला माहित."

नारायणी म्हणाली, "तें माहित आहे मला. आई हीच गोष्ट गेले चारपांच दिवस तुमच्या कानींकपाळीं ओरडून सांगतेय वाटतं?"

श्यामलाल थोडासा ओशाळला. थोडीशी चुळबुळ करीत तो म्हणाला, "नाहीं. ती तसं कांहीं बोलली नाहीं—पण लोकांना डोळे आहेत ना? मला स्वतःलासुद्धां कांहीं दिसून येत नाहीं असं का तुला वाटतं?"

नारायणी म्हणाली, "मी असं कुठं म्हटलं? पण त्याचं आहे कोण? कुणाला घेऊन तो वेगळा राहाणार आहे? आई आहे, कीं बहीण आहे, कीं एखादी मावशी–आत्त्या कुणी आहे? त्याला जेवण करून कोण घालणार?"

श्यामलाल चिरडीला येऊन म्हणाला, "तें कांहीं मला माहित नाहीं!"

तोंडानें तो असें बोलला खरा, पण अंतरांत त्याचें त्यालाच काय तें कळून चुकलें होतें. एवढी मोठी महत्त्वाची गोष्ट त्याला कळल्याशिवाय कशी राहिली असती? नारायणी कांहींतरी बोलणार होती पण तिचे ओंठ थरथर कांपू लागले. थोडावेळ थांबून तिनें आपलें मन आवरून घेतलें. गळा दाटून येऊन ती म्हणाली, "असं पहा, तेराव्या वर्षी मुली बाहुल्या घेऊन खेळत असतात. त्या वयांत सासूबाईनीं हा संसाराचा सारा भार माझ्या माथीं मारला अन् सुखानं स्वर्गाची वाट धरली. हा बोजा मी नीटपणें उचलतेंय कीं नाहीं हें त्या पहाताहेत. रांधतें वाढतें, मुलाला सांभाळतें, नात्यागोत्याच्या माणसांना आखरे-खतें, संसाराचा सारा भार एकट्याच्या माथीं घेऊन आज सव्वीस वर्षांची अर्धी-बुद्धी बाई होऊन बसलेंय मीं. अशावेळीं माझ्या या घरसंसारांत हात घालायला याल, तर खरं सांगतें तुम्हांला, मी जाऊन नदींत जीव देईन. मग खुशाल तुम्ही दुसरं लग्न करा अन् रामला वेगळा करून ठेवा. मग काय मनाला येईल तसा संसार करा, मीं तें पाह्यला यायची नाहीं कीं बोलायलाही. पण माझ्या नजरे-समोर हें नको."

श्यामलाल तसा मनांतून बायकोला वचकत असे. यावर तो अधिक कांहीं बोलला नाहीं. त्या रात्रीं तें बोलणें तेव्हढ्यावरच राहिलें.

दुसऱ्या दिवशीं नारायणीनें रामला बोलावून जवळ बसवून घेतलें आणि मोठ्या ममतेनें त्याच्या पाठीवरून हात फिरवीत ती म्हणाली, "राम, आतां इथं तुझं राहणं यापुढं जमायचं नाहीं रे भाई. तूं वेगळा हो अन् दुसऱ्याकुठंतरी जाऊन राहा. राहाशील ना?"

रामनें एकदम संमति दिली. तो गालभर हंसून म्हणाला, "राहीन तर काय वहिनी! तूं, मी, गोविंद आणि भोला. कधीं जायचं वहिनी?"

नारायणी निरुत्तर होऊन बसून राहिली. एव्हढं ऐकल्यावर ती आणखी काय बोलणार होती? पण रामनें बोलणें थांबू दिलें नाहीं. त्याला मोठा उत्साह आला होता. तो म्हणाला, "कधीं जायचं वहिनी?"

त्याच्या प्रश्नाचें उत्तर द्यायच्याऐवजीं तिनें त्याला आपल्या हृदयाशीं कवटाळून धरलें आणि म्हटलें, "तुझ्या या वहिनीला टाकून तुला एकटं राहातां नाहीं यायचं?"

राम मान हालवून म्हणाला, "नाहीं!"

"आणि वहिनी मेली तर?"

"जा: !—"

"जा नव्हे—वहिनीचं सांगितलेलं ऐकत नाहींस–आतां कळेल तुला काय तें!"

राम वर्दळीला येऊन म्हणाला, "कधीं तुझं ऐकलं नाहीं?"

नारायणी म्हणाली, "कधीं ऐकतोस तें सांग ना? किती दिवस सांगतेंय तुला, कीं माझ्या आईचा अपमान करूं नकोस—तरी पण तूं कांहीं तिचा अपमान करायचं सोडीत नाहींस. काल तिला टाकून बोललास—तिचा अपमान केलास! आतां मात्र मी जिकडे वाट फुटेल तिकडे निघून जाणार आहे!"

"मीही येईन तुझ्याबरोबर!"

"तुला कसं कळणार आहे मी केव्हां जाईन तें! मी गुपचुप लपून छपून चालती होईन."

"अन् गोविंद?"

"तो राहील तुझ्यापाशीं. तूं आण त्याला माणसांत."

"नाहीं. तें आपल्याच्यानं व्हायचं नाहीं वहिनी!"

नारायणी हंसून म्हणाली, "तुला करायलाच हवं तें!"

रामचा त्या तिच्या भाषणावर मुळींच विश्वास बसला नाहीं. तो हो हो करीत हंसत सुटला आणि म्हणाला, "सारं खोटं! सारी बनवाबनवी! तूं कुठंच जायची नाहींस!"

"खोटं नव्हे—अगदीं खरं आहे. कळेल तुला मी निघून जाईन तेव्हां."

राम अनुतप्त होऊन म्हणाला, "अन् तूं सांगशील तें तें ऐकलं तर—मग?"

नारायणी तोंडभर हंसून म्हणाली, "मग नाहीं जायची. तुला अन् गोविंदला लहानाचं मोठं केलं पाहिजे ना!"

राम खूष होऊन म्हणाला, "ठीक आहे—आजपासून पाहा तर."

: ३ :

कोणत्याही प्रकारची गडबड झाल्याशिवाय आठ दिवस गेले. दिगंबरी तोंड टाकीत नव्हती असें नाहीं, पण राम चिडत नव्हता. त्या दिवशीं वहिनीनें सांगितलें तें जरी रामला तितकेसें खरें वाटलें नव्हतें तरीही त्यानें एक प्रकारची भीति घेतली होती.

पण देवाला तें आवडलें नव्हतें—पुन्हां एक भानगड झाली. आपल्या बापाच्या श्राद्धासाठीं दिगंबरीनें आज बारा ब्राह्मणांचें भोजन घालण्याचा संकल्प सोडला होता. तिच्या बापाचा प्रेतात्मा इतके दिवस मुलाच्या घरीं गुपचुप राहिला होता—आतां त्यानें नातजांवयाच्या घरीं ये जा करायला सुरवात केली होती–अर्थात् स्वप्नांत–तरी पण त्याला संतुष्ट केलें पाहिजे होतें ना?

सकाळच्या वेळीं राम गणितें सोडवीत बसला होता. तितक्यांत भोला आला आणि त्यानें हळूच बातमी दिली, "दादाठाकूर, तुमच्या कार्तिकगणेशाला धरण्यासाठीं भगा बाग्दी जाळं घेऊन आलाय. चला बघायला."

नदीच्या घाटावर बऱ्याच दिवसांपासून बरेच जुनाट असे भले मोठे दोन मासे पाण्यांत तळपत असत. ते दोन्हीं मासे माणसांना मुळींच भीत नसत.

राम म्हणे, कीं ते त्याचे पाळीव मासे होते. त्यानें त्यांचीं नावें ठेवलीं होतीं कार्तिकगणेश. या कार्तिकगणेशाच्या असाधारण रूपगुणांचें विवरण रामच्या तोंडून ऐकलें नाहीं आणि त्याच्या आग्रहामुळें एकदां तरी त्यांना पाहायला आला नाहीं, असा एकही माणूस त्या गांवांत नव्हता. त्यांच्यांत एव्हढें विशेष काय होतें तें त्याचें त्यालाच माहित होतें, त्याचप्रमाणें त्यांतला कार्तिक कुठला आणि गणेश कुठला हें त्यालाच ओळखतां येत असे. भोलाला देखील तें अचुक सांगतां येत नसे म्हणून रामच्या हातची कानपिळणी केव्हां केव्हां त्याला घ्यावी लागे.

नारायणी हंसून म्हणत असे, "रामच्या कार्तिकगणेशाचा सदुपयोग होईल तो माझ्या श्राद्धाच्यावेळीं !"

भोलाच्या बातमीचा रामच्या मनावर मुळींच परिणाम झाला नाहीं. स्लेट पाटीवर झुकून आंकडे मोडीत असतांना तो म्हणाला, "एकदां जाळं टाकून तर पहा म्हणावं ! जाळं तोडून बाहेर येतील ते."

भोला म्हणाला, "नाहीं दादा ठाकूर, हें आमचं जाळं नव्हे. भगानं कोळ्याचं मोठं जाळं मागून आणलंय. तें तुटायचं नाहीं."

पाटी बाजूला ठेवून राम म्हणाला, "चल तर बघूं !"

तळ्याच्या काठीं येऊन तो पहातो तों कार्तिकगणेशाच्या बाबतींत तिथें कांहींतरी भानगड सुरू झाली होती.

घाटाच्या जवळ जाऊन भगा पाण्यांत चुरमुरे टाकून हातांत जाळें घेऊन तयार राहिला होता.

राम आला आणि त्याला एक धक्का देऊन म्हणाला, "दळभद्र्या, चुरमुरे टाकून माझे मासे बोलावतोयस का ?"

भगा रडकुंडीला येऊन म्हणाला, "बडेबाबूंनीं हुकूम सोडलाय. दुसरा मासा कुठंच मिळेना दादा ठाकूर."

रामनें त्याच्या हातचें जाळें हिसकावून घेतलें आणि त्याला एक गुद्दा मारून लोटून तो म्हणाला, "चल नीघ येथून."

जाळें गोळा करून घेऊन भगा मुकाट्यानें निघून गेला.

राम पुन्हां घरीं येऊन आपली पाटी पेन्सील घेऊन बसला. कुणावरही राग करायचा नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली होती.

दिगंबरी आज अगदीं सकाळींच आपलें पूजा आन्हिक उरकून घेत होती. नेत्तीनें येऊन खबर दिली, " मासा मिळाला नाहीं आजीबाई. छोटेबाबूंनीं भगा बाग्दीला मार देऊन घालवून दिलं. "

या दोन्हीं माशांवर दिगंबरीची आशाळभूत नजर गेली होती. त्या मोठ्या माशांच्या डोक्याच्या बाबतींत त्या विधवेला काय वाटत होतें तें न सांगितलेलेंच बरें. अर्थात् तिचा जो हा लोभ होता तो स्वतःसाठीं नव्हता.—आपल्या वतीनें कोणत्या तरी सत्कार्यासाठीं स्वहस्तानें रांधून एकाद्या सत्पात्र ब्राह्मणाच्या पानांत मासा वाढला गेला कीं आपल्याला पुण्य आणि कीर्ती मिळेल, अशी वासना पुष्कळ दिवसांपासून तिनें आपल्या मनांत बाळगली होती.

काल तिनें जांवईबुवांची संमति घेतली होती–अर्थात् कार्तिकगणेशच्या नांवाचा मागमूससुद्धां तिनें लागूं दिला नव्हता. कोळ्याकडचें मोठें आणि मजबूत जाळें आणवून मासा धरण्यासाठीं तिनें भगा बाग्दीला बक्षिसादाखल चार आणे देण्याचें कबूल केलें होतें. अशा प्रकारें सारी तयारी अगदीं जय्यत करून ठेवण्यांत आली होती.

आज सकाळींच जाऊन तिनें ते मासे घाटाजवळच्या पाण्यांत तळपत असलेले पाहिले. निश्चिंतपणें ती मोठ्या खुषीनें घरीं येऊन जप करायला बसली होती, तोंच ही अशा प्रकारची बातमी आल्यामुळें तिच्या मनावरचा ताबा एकदम सुटला, हिताहिताचें ज्ञान नाहींसें झालें. राग येतांच दांत करकर वाजवायची तिला संवय होती, त्याप्रमाणें दांतावर दांत घाशीत गळ्यांतली माळ उंच करून धरून ती उद्गारली, " अरे हा वैर साधतोय माझं. एकदां हा कार्टा मरेल त्या दिवशीं माझीं हाडं शांत होतील. अनशापोटीं अजून तोंडांत पाणीसुद्धां घेतलेलं नाहीं–देवा, तूं कुठं असशील तर याला खरोखरीच बघून घे–आजची रात्रसुद्धां उलटूं देऊं नकोस ! "

नारायणी जवळच बसून भाजी चिरीत होती. ती झटक्यासरशीं ताड्कन उठून उभी राहिली आणि खडसावून ओरडली, " आई ! "

लेकराच्या तोंडच्या 'आई' या हांकेला तोड नाहीं. असें म्हणतात. नारायणीच्या तोंडच्या आजच्या या आईच्या हांकेला खरोखरच तोड नव्हती. या एका अक्षराच्या हांकेसरशी दिगंबरीच्या हृदयांतलें रक्त गोठून गेलें.

पण नारायणी देखील त्यानंतर कांहीं अधिक बोलली नाहीं. पहातां पहातां तिच्या दोन्ही डोळ्यांतून टपटपां आंसवें गळूं लागलीं. क्षणभऱ्यानें तिनें डोळे पुसून घेतले आणि राम ज्या जागीं अभ्यास करीत बसला होता त्या जागीं येऊन ती उभी राहिली.

तिनें त्याला दरडावून विचारलें, " भगा वाग्दीला मार देऊन हांकून लावलंस का तूं ? "

राम दचकला. पाटीवरची नजर काढून त्यानें एक क्षणभरच तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें आणि उत्तर द्यायचा एव्हढासुद्धां प्रयत्न न करतां समोरच्या दरवाजांतून त्यानें सूंबाल्या ठोकला.

नारायणीला हा अंतर्गत कट माहित नव्हता. तिनें भगा वाग्दीला बोलावून घेतलें आणि मासा धरायचा हुकूम सोडला.

हुकूम मिळतांच भगा वाग्दी जाळें घेऊन गेला आणि थोड्याच वेळांत एक भला मोठा मासा आणून त्यानें धाड्कन अंगणांत टाकला. सैंपाकघरच्या दारांत उभ्या असलेल्या नारायणीची नजर माशाकडे जातांच तिच्या अंगावर शहारे उभे राहिले. ती साशंक होऊन म्हणाली, " कायरे, घाटावरून धरून आणलास नाहीं ना हा ? हा रामचा कार्तिकगणेश तर नव्हे ? "

एव्हढ्या थोड्या वेळांत एव्हढा मोठा मासा आपल्याला आणतां आला याजबद्दल बहादुरी प्रदर्शित करीत तो म्हणाला, " जी होय. हाच तो बडा मासा–मोठा जब्बर मासा आहे ! " दिगंबरीकडे बोट दाखवून तो म्हणाला, " या आजीबाईनीं हाच मासा धरून आणायला सांगितलं होतं मला. "

नारायणी स्तंभित होऊन उभी राहिली होती. नृत्यकाली रामवर तितकीशी खूष नसे, तरीही मासा पहातांच ती रागाला आली. ती दिगंबरीला म्हणाली, " काय हें आजीबाई ? छोट्याबाबूंच्या या कार्तिकगणेशाला सारा गांव ओळखतो— काय म्हणून हा मासा धरून आणायला सांगितलं तुम्हीं ? दोनतीन तळीं आहेत त्यांत काय दुसरे मासेच नव्हते ? दहाबारा माणसं जेवणारीं, तिथं या एका आधमणी माशानं काय होणार आहे ? लौकर कुठंतरी दृष्टीआड करा हा. कुठं गेलेयत ते येतील इतक्यांत. "

दिगंबरी तोंड वेंगाडून म्हणाली, " हें एव्हढं मला तरी काय माहित ? एक कुठला मासा धरून आणला तर हजार बयादी लावल्यायत तुम्ही ! हा छपवून का ठेवायचा ? ब्राह्मणाच्या तोंडीं नको का लागायला ? "

नेत्ति म्हणाली, " तुमचे बामण जेवणार आहेत दोन अडीचला. अजून खूप वेळ आहे. छोटेबाबू आधीं शाळेला जाऊं देत–नाहींतर आज कुणाची धडगत नाहीं. अरे देवा ! तो भोला आत्तांच इथं उभा होता, तो गला कुठं ? तो खबर द्यायलाच गेला वाटतं धांवत ! आतां कांहींतरी एकदां करा बाई– अशा उभ्या राहूं नका. "

चार आण्याच्या लोभानें भगानें जाळें मागून आणलें होतें, पण हा सारा प्रकार पाहून पैशाची आशा सोडून तो जाळें घेऊन निघून गेला होता.

तशीच जरूर लागली तर रामला केव्हां कुठें गांठावें तें भोलाला नक्की माहित होतें. तो धांवतच गेला आणि बागेच्या उत्तर कोपऱ्यांत असलेल्या पेरूच्या झाडाखालीं येऊन हजर झाला. राम एका फांदीवर बसून पाय झुलवीत पेरू खात होता. भोला धांपा टाकीतटाकीत म्हणाला, " आधीं लौकर या दादाठाकूर, भगानं तुमचा कार्तिक मारून आणलाय. "

पेरू खाणें थांबवून राम म्हणाला, " जा : !—"

" खरोखरच दादाठाकूर, आईनींच त्याला सांगितलं म्हणून त्यानं धरला. अजून अंगणांतच पडलाय तो. चला बघायला. "

रामनें एकदम खालीं उडी टाकून धांव घेतली. वाऱ्यासारखा पळत तो जो आला, तो अंगणाच्या समोर येतांच एकदम दचकून उभा राहिला. एक मोठी हांक फोडून तो म्हणाला, " अरे ! हा तर माझा गणेश ! वहिनी, तूं सांगितलंस माझा गणेश धरून आणायला ? " असें म्हणून त्यानें जमिनीवर लोळण घेतली आणि कापलेल्या बोकडासारखा तो हातपाय झाडूं लागला. त्याचें हें दुःख किती खरोखरीचें होतें, किती दुर्दम्य होतें, या बाबतींत आतां दिगंबरीला देखील संशय राहिला नव्हता.

त्याला भरवण्यासाठीं रात्रीं नारायणीनें खूप ओढाओढ केली, पण रामनें तिचा हात धाड्कन् उडवून दिला. सारा दिवस तो उपाशी होता, म्हणून घांसभर भात तोंडांत घालून तो एकदम उठून गेला.

दाराआड उभी राहून दिगंबरी जांवयाला म्हणाली, " तुम्ही एकदां सांगा, नाहींतर नारायणी जेवायची नाहीं. सारा दिवस उपाशी आहे ती. "

शामलालनें विचारलें, " उपाशी कां ?

दिगंबरीला रडूं येत नव्हतें तरीही आवाज रडवा करून ती म्हणाली, " माझ्या हजार चुका झाल्यायत बाबा. ब्राह्मणभोजनासाठीं तळ्यांतून एक मासा धरून आणला तर एव्हढं महाभारत माजेल हें मला तरी कसें कळावं ? "

श्यामलालला नीटसें कळलें नाहीं. त्यानें हांक मारली, " नेत्ति, काय झालंय ग ? "

नृत्यकाली आड उभी राहून म्हणाली, " छोट्याबाबूंचा गणेश होता तो. "

शामलाल दचकला आणि म्हणाला, " राम्याच्या कार्तिकगणेशापैकीं एक का ? "

नेत्ति म्हणाली, " हो. "

आतां अधिक कांहीं सांगायची जरुरीच राहिली नव्हती. झालेली सारी भानगड लक्षांत आल्यामुळें तो म्हणाला, " राम जेवला नाहीं वाटतं ? "

नेत्ति म्हणाली, " नाहीं. "

शामलाल म्हणाला, " मग तिला जेवायला सांगण्यांत काय अर्थ आहे ? तो जेवला नाहीं-ती कशी जेवील ? "

दिगंबरी बोलत होती,—" असा कांहीं भयंकर प्रकार होईल असं मला वाटलं असतं तर ब्राह्मणभोजनाची गोष्टसुद्धां मी काढली नसती रे बाबा ! तिनं स्वतःच मासा धरून आणायचा हुकूम सोडला अन् आतां ती स्वतःच असं कां करतेय तें तिचं तिलाच माहित ! मी एक शब्दशुद्धां बोललें नव्हतें—पण आतां सारा दोष आलाय माझ्या माथीं. नाहीं तर असं करा, आम्हांलाच कुठंतरी घालवून द्या. आतां या घरीं घडीभरसुद्धां राह्यची सोय राहिलेली नाहीं!—"

एक क्षणभर वाट पाहून पुन्हां रडवा आवाज काढून ती म्हणाली, " हें असं माझं कपाळ फुटलं नसतं तर सोन्यासारखा भाऊ कां मेला असता ? अन् आतां हा असा लाथा झाडू खात राह्यचा प्रसंग कां आला असता ? आम्हांला कसलासुद्धां आधार नाहीं रे बाबा. तेव्हां हात जोडून सांगतें, तुम्हींच कांहींतरी आमची वासलात लावायला हवी ! "

श्यामलाल अस्वस्थ झाला, पण होय किंवा नाहीं असें कांहींच बोलला नाहीं.

नारायणी आड उभी राहून सारें कांहीं ऐकत होती. आपली आई निर्लज्जपणें बेछूट खोटें बोलत आहे असें पाहून शरमेनें ती मेल्याहून मेली झाली होती. ती तिथून मागें वळली आणि रामच्या खोलीच्या बंद असलेल्या दारावर थाप मारून म्हणाली, "माझा लाडका बाळ तो! जरा दार उघड पाहूं!"

राम जागाच होता पण त्यानें उत्तर दिलें नाहीं.

नारायणीनें पुन्हां हांक मारली, "ऊठ–दार उघड."

आतां मात्र तो एकदम किंचाळून म्हणाला, "नाहीं–नाहीं उघडीत–तूं जा इथून. तुम्ही सारे शत्रू आहांत माझे!"

"बरं बरं, तसंच म्हण. तूं दार उघड आधीं."

"नाहीं–नाहीं–नाहीं. मी दार उघडणार नाहीं!"

त्या रात्रीं त्यानें खरोखरीच दार उघडलें नाहीं. शामलाल आपल्या खोलींतून सारें कांहीं ऐकत होता. नारायणी आंत येतांच तो म्हणाला, "आतां याला कांहींतरी उपाय तूंच कर, नाहींतर मी वाट फुटेल तिकडे निघून जाईन. हीं असलीं घरांतलीं भांडणं कांहीं मला परवडत नाहींत."

नारायणी निरुत्तर होऊन आपल्याशींच विचार करूं लागली.

यानंतर असेच दोन तीन दिवस गेले, तरीही रामचा राग ओसरला नाहीं असें पाहून नारायणीला चीड आली. त्या दिवशीं संध्याकाळ झाली तरीही राम शाळेंतून आला नाहीं असें पाहून नारायणीला काळजी वाटूं लागली—तितकाच तिला रागही आला होता. त्याचवेळीं दिगंबरी नदीवरून स्नान करून परत येत होती. घरसंसाराचा सारा पाढा घाटावर वाचीत, रामला शिव्याशाप देत, मोठ्या मुलीच्या मुलखावेगळ्या वागणुकीमुळें पुढें होणाऱ्या भयंकर परिणामाची शेजारणीशीं घोषणा करीत, हालअपेष्टा भोगल्यामुळें अल्पवयांत आपले केंस कसे पिकले त्याचीं कारणें सांगत,—इतकेंच नव्हे, तर आपलें सुद्धां वय नारायणी-इतकेंच आहे असें प्रस्थापित करीत, भावाच्या संसारांत आपण सारे अधिकार कसे गाजवीत होतों त्याचा विश्वासार्ह इतिहास सांगत, जिवाचें समाधान करून

घेतल्यावर शांतपोक्तपणें ती घरीं यायला निघाली असतां वाटेंतच तिला एक विलक्षण गोष्ट कळली, त्यामुळें ती जणूं काय वाऱ्यावर उडतउडतच घरीं येऊन पोंचली.

आंगणांत पाऊल टाकतांच ती मोठ्यानें ओरडून म्हणाली, "तुझ्या त्या गुणवान दीराची भानगड ऐकलीस का नारायणी ?"

नारायणी भीतीनें गोरीमोरी झाली. तिनें विचारलें, "कसली भानगड ?"

दिगंबरी म्हणाली, "ते आतां पोलीसठाण्यावर गेलेयत—कसे नाहीं जायचे ? अगदीं बदमाष पोर आहे हा. सात जन्मांत असा कार्टा पाहिला नव्हता. आतां जा म्हणावं तुरुंगांत !"

तिच्या चेहऱ्यावर उसळून आलेल्या आनंदाची छटा झळकत होती.

नारायणीनें तिला कांहीं उत्तर दिलें नाहीं. ती हांक मारून म्हणाली, "नेत्ति, अजून राम आला नाहीं का ? जरा भोल्याला पाठवून त्याला शोधून आण म्हणावं."

दिगंबरी म्हणाली, "मी ऐकून आलेंय ती सारी हकिकत."

ती हकिकत ऐकण्यासाठीं नृत्यकाली आ वासून उभी राहिलेली पाहून नारायणी तिला धमकावून म्हणाली, "उभी राह्यलीयस कशाला ? ऐकूं नाहीं का आलं ?"

नृत्यकाली नाराज होऊन निघून गेली. आवाजांत शक्य तितकी उद्वेगाची छटा आणून दिगंबरी म्हणाली, "काय झालंय तें कळलं का तुला नारायणी ?—"

"आधी तूं हे ओले कपडे बदलून ये पाहूं आई–मग काय सांगायचं तें सांग—" असें म्हणून ती एकदम दुसरीकडे निघून गेली. दिगंबरी थक्क होऊन आपल्याशींच उद्गारली, "अगबाई ! पोरीचा राग तर पहा !—" सर्वांच्या आधीं ती हकिकत सांगायची संधी न मिळाल्यामुळें तिचें तोंड फुगूं लागलें होतें.

थोडक्यांत सांगायचें म्हणजे ती भानगड अशी होती–गांवांतल्या शाळेंत गांवच्या जमीदाराचा एक मुलगा शिकायला येत असे. आज टिफिनच्या वेळीं रामचा त्याचा वादविवाद सुरू झाला. वादाचा विषय मोठा भानगडीचा असल्यामुळें त्याचें निराकरण व्हायच्या ऐवजीं दोघांची मारामारी जुंपली. जमीदाराचा

मुलगा म्हणत होता, " शास्त्रांत असं लिहिलंय, कीं रक्षाकालीपेक्षां स्मशानकाली हें दैवत अधिक जागृत आहे. कारण स्मशानकालीची जीभ केव्हढीतरी लांब आहे. "

त्याला खोडून टाकण्यासाठीं राम म्हणाला, " मुळींच नाहीं. स्मशान-कालीची जीभ थोडीशी चौडी आहे खरी, पण तितकीशी मोठीही नाहीं कीं फारशी लालही नाहीं. " थोड्या दिवसांपूर्वी गांवांत वर्गणी करून गांवच्या लोकांनीं उत्सव केला होता त्यावेळची आठवण रामच्या मनांत अजूनही जागी होती.

जमीदाराच्या मुलाला रामचा मुद्दा पटला नाहीं. आपला तळहात पसरून आंगठा धरून दाखवीत तो म्हणाला, " रक्षाकालीची जीभ आहे एव्हढीशीच ! "

राम संतापून म्हणाला, " एव्हढीशीच कां ? मुळींच नाहीं. ही एव्हढी मोठी आहे तिची जीभ. एव्हढीशी जीभ असली तर साऱ्या पृथ्वीचं रक्षण तिला कसं करतां येईल ? पृथ्वीचं रक्षण करते म्हणूनच ना तिला रक्षाकाली म्हणतात ? "

त्यावर अशीच आणखी थोडीशी शद्बाशद्बी झाली आणि मग गुद्दागुद्दीवर पाळी आली. जमीदाराचा मुलगा होता थोडासा दुबळाच, अर्थात जास्त मार मिळाला तो त्यालाच. नाकांतून रक्ताचे एकदोन थेंब सुद्धां आले ! या छोट्याशा शाळेच्या इतिहासांत एव्हढा भयंकर प्रकार यापूर्वी कधींच घडला नव्हता. जमीदाराच्याच शाळेंत त्याच जमीदाराच्या मुलाच्या नाकांतून रक्त आलें म्हणजे काय !

अतएव हेडमास्तर शाळा बंद करून मुलाला बरोबर घेऊन स्वतः दरबारीं हजर राहायला निघून गेले. हें सांगायला नकोच, कीं रामलाल यापूर्वीच अंतर्धान पावला होता.

दादाठाकूरचा पत्ता लागत नाहीं असें भोलानें येऊन सांगितलें. थोड्याच वेळांत शामलाल काळवंडलेल्या मुद्रेनें घरीं आला. आंगणांतच उभा राहून तो म्हणाला, " अग ए, ऐकलंस का ? हा गांव सोडून आतां कुठंतरी जावं लागणार. नोकरी करून चार पैसे घरीं आणीत होतों तेंही आतां मला वाटतं संपलंच. "

नारायणी कोठींतून बाहेर आली आणि दाराला धरून उभी राहून कोरड्या वाणीनें म्हणाली " ते ठाण्यावर गेले आहेत वाटतं ? "

शामलाल होकार देऊन म्हणाला, " बाबू म्हणजे एक देवमाणूसच. त्यांनीं क्षमा केली, पण इतर चारजण आहेतच ना ? रोजरोज जर अशा नव्यानव्या भानगडी उपस्थित होऊं लागल्या तर गांवांत राह्यचं कसं ? राम कुठंय ?"

नारायणी म्हणाली, " अजून आला नाहीं तो. घाबरून पळून गेला वाटतं बहुतेक."

शामलाल गंभीर होऊन म्हणाला, " पळो कीं न पळो, यापुढं त्याचा संबंध पुरे झाला. सावत्र आईचा मुलगा, लोक नावं ठेवतील, म्हणून इतके दिवस सारं कांहीं कसंबसं सहन करीत आलों—पण आतां हद्द झाली ! आतां आधीं स्वतःचा जीव बचावायला हवा."

दिगंबरी सैंपाकघराच्या ओटीवरून म्हणाली, " पोटच्या पोराच्या तोंडाकडे तर पाह्यलं पाहिजे ! "

शामलाल उत्साहित होऊन म्हणाला, " पाह्यलं पाहिजे तर—अवश्य पाहिलं पाहिजे. तेव्हां आतां मी ठरवलंय—उद्यां गांवचे चार लोक बोलवायचे आणि घरदार जमीनजुमल्याची वांटणी करून त्याला वेगळा ठेवायचा !—अन् तुलाही सांगून ठेवतोंय, त्याच्या बाबतींत यापुढं तूं कमीजास्त बोलायची कांहीं जरुरी नाहीं. त्याला जें बरं वाटेल तें तो करील. सारं कळतंय त्याला—म्हणून धन्यांच्या मुलाच्या अंगावर हात टाकला ना त्यानं ? "

दिगंबरी मनांतल्या मनांत अत्यंत आनंदित झाली होती. ती म्हणाली, " नारायणी त्याला शिक्षा लावायला कां धांवते कोण जाणे ! मला तर तें पाहतांच भीतीनं थरकांप भरतो. गव्हार आहे तो पोर. तो माझा सुद्धां जिथं अपमान करतो तिथं त्याचा अपमान झाला तर त्यांत अधिक तें काय झालं ? मी म्हणतें, मान ! कसला मान ? स्वतःचा मान स्वतःपुरता—या रामच्या बाबतींत पडूं नको म्हणावं ! "

रामबद्दल सासूबाईनीं काढलेल्या या उद्गारांना शामलालला होकार देतां येईना. लोकलाज म्हणून कांहीं आहेना ? तो म्हणाला, " कांहीं कां असेना,

यापुढं त्याला शिक्षा लावायची मुळींच जरुरी नाहीं."

नारायणी दगडाच्या पुतळीसारखी ताठरून निश्चलपणें सारें कांहीं मुकाट्यानें ऐकत होती. त्यांच्या बोलण्यावर तिनें कांहीं सुद्धां उत्तर दिलें नाहीं. त्यानंतर ती कांहीं न बोलतां आपल्या कामाला निघून गेली.

घटकाभऱ्यानें नृत्यकाली आली आणि हळूच म्हणाली, "बाई, छोटेबाबू आपल्या खोलींत आलेयत."

नारायणी मुकाट्यानें उठली आणि रामच्या खोलींत जाऊन तिनें दार बंद करून घेतलें. राम आपल्या खाटेवर चूपचाप बसून आपल्याशींच विचार करीत होता. दरवाजा बंद केल्याचा आवाज ऐकून त्यानें दचकून पाहिलें, तों वहिनी दार बंद करून घेऊन खोलीच्या कोपऱ्यांत असलेली त्याचीच बारीकशी वेताची छडी उचलून हातीं घेत होती. ताड्कन उडी मारून तो खाटेपलीकडे जाऊन उभा राहिला. नारायणी दरडावून म्हणाली, "आधीं इकडे ये."

राम हात जोडून म्हणाला, "आतां असं कांहीं करणार नाहीं वहिनी. आजच्यापुरता मला सोडून दे."

नारायणी कठोर होऊन म्हणाली, "मुकाट्यानं आलास तर थोडाच मार मिळेल—पण न आलास तर हा वेत तुझ्या पाठीवर फोडून काढीन."

तरीही राम तिथून हालेना. त्याच जागीं राहून तो काकुळतीला येऊन बोलत होता,—"अगदीं त्रिवार करून सांगतों वहिनी, यापुढं असं कांही करणार नाहीं! हा कान पिरगळून घेतों वहिनी—"

खाटेवर वांकून नारायणीनें सप्कन एक वेताचा तडाखा मारला. त्यानंतर एकामागून एक सारखे वताचे फटके लगावायला तिनें सुरवात केली. पहिल्यानें त्यानें इकडचा दरवाजा उघडून पळायचा प्रयत्न केला, त्यानंतर तो खोलीभर धांवाधांव करीत बचावायचा प्रयत्न करूं लागला. शेवटीं तिच्या पायापाशीं घालून तो सारखा ओरडत सुटला. नृत्यकाली मागल्या बाजूनें येऊन खिडकीच्या फटींतून पहात होती. ती रडतरडत ओरडली, "सोडा त्याला बाई, अशा मारूं नका. मी जामीन राहातें—"

दिगंबरी खेंकसून म्हणाली, "प्रत्येक गोष्टींत तोंड घालायला कशाला येतेस तूं?"

शामलाल खोलींतून हांक मारून म्हणाला " काय चाललंय तें! सारी रात्र मारीत बसणार आहेस होय?"

नारायणीनें छडी फेंकून दिली आणि म्हटलें, " याद राखून ठेव!"

: ४ :

राम जेवायला बसला होता. दिगंबरी दाराआड बसून सूर काढून बोलत होती, " एवढ्या मोठ्या मुलाला असं काय मारायचं तें! त्याचा वडील भाऊ कधीं त्याच्यावर हातसुद्धां उगारीत नाहीं."

नृत्यकाली काम करताकरतां म्हणाली, " तुम्ही कांहीं कमी नाहीं आजी-बाई! तुम्हीच तर या साऱ्या गोष्टी सांगून बाईंचं डोकं उठवतां." त्या रात्रीं त्याला बसलेला मार पाहून नेत्तीला बरें वाटलें नव्हतें.

तें ऐकून राम डोळे वटारून म्हणाला, " ही थेरडी जखीण आम्हां सर्वांना खायला आलीय!"

दिगंबरी एकदम ओरडत सुटली, " अग ऐक नारायणी, ऐक तुझ्या या दीराचीं बोलणीं."

नारायणी स्नान करण्यासाठीं जात होती ती मागें फिरली आणि मेंगळून म्हणाली, " नाहीं आई, यापुढं हें कांहीं ऐकवत नाहीं माझ्याच्यानं. खरं सांगतें नेत्ति, मेलें कीं थंड होईल माझा जीव. आतां हें नाहीं सहन करवत. अरे मेल्या माकडा, अजून तुझ्या पाठीवरचे डाग वाळले नाहींत तोंच सारं विसरून गेलास?"

रामनें उत्तर दिलें नाहीं. तो मुकाट्यानें जेवीत होता. अधिक कांहीं न बोलतां नारायणी स्नान करण्यासाठीं निघून गेली.

अंगणांत एक पेरूचें झाड होतें. जेवण उरकल्याबरोबर राम त्याच्यावर चढून बसला आणि हाताला येतील तसे कच्चे पक्के पेरू बेफामपणें चावीत सुटला. कांहीं त्यानें थोडेसे खाल्ले, तर कांहीं नुसतेच चावा घेऊन फेंकून दिले. अगदींच कच्चे होते ते निष्कारण तोडून इकडे तिकडे फेंकून दिले.

तें पाहून दिगंबरीच्या अंगाचा भडका झाला. नारायणी अजून आली नव्हती. ती येईपर्यंत तें पाहणें अशक्य होऊन ती म्हणाली, " पिकलेले पेरूसुद्धां चावायचा जोर नाहीं दांतांत आणि कशाला उगीच कच्चे पेरू उधळून टाकतोयस रे पोरा?"

तिच्या भाषणाची रामला केव्हांही चीड येत असे. आपल्याला मार कां बसला त्याचें कारण नृत्यकालीकडून नुकतेंच कळल्यामुळें तो रागानें धुसमुसत होता. झाडावर बसल्याबसल्या तो ओरडून म्हणाला, "छान करतोंय—थेरडे!"

कोणत्याही शिवीपेक्षां हें विशेषण दिगंबरीला असह्य होत असे. ती तोंड वेंगाडून म्हणाली, "थेरडे का! छान करतोयस का! बरंबरं आतां येऊं दे ती. जसला कुत्रा तसलाच सोटा पाहिजे त्याला! काय व्रात्य कार्टं आहे रे बाबा! मार खाऊन पाठीची चामडी सोलून निघाली तरीसुद्धां लाज वाटत नाहीं."

राम झाडावरूनच म्हणाला, "जखीण! थेरडी!"

"जखीण थेरडी का! लहान तोंडीं मोठा घांस आहे बरं हा! पाजी हरामजादा–खालीं उतर म्हणतें ना."

राम म्हणाला, "कां म्हणून खालीं उतरेन? तुझ्या बापाचं झाड आहे हें?"

दिगंबरीचें माथें भडकलें. ती किंचाळून म्हणाली, "आं:! बाप काढतोस? ऐकलंस नेत्ति, ऐकलंस?"

अगदीं याच वेळीं नारायणी घाटावरून येऊन पोंचली. झाडावर नजर जातांच ती म्हणाली, "जेवल्याबरोबर गेला नाहींस शाळेंत? झाडावर चढून बसलायस?"

वहिनी घाटावरून येत असतांना दिसली कीं झाडावरून उतरून पळून जायचें असा रामचा विचार होता. पण भांडणाच्या गर्दीत रस्त्याकडे त्याची नजर गेली नाहीं. अचानक वहिनी येऊन आंगणांत उभी राहिली होती.

तो घाबरून म्हणाला, "पेरू खातोंय."

"खातोयस तें दिसतंय! शाळेंत गेला नाहींस?"

"माझ्या पोटांत दुखतंय ना!"

नारायणी संतापून म्हणाली, "म्हणूनच का जेवल्याबरोबर पेरू खात बसलायस?"

मुलीचा आवाज कानीं पडतांच दिगंबरी धांवतच आली आणि म्हणाली, "या मेल्या हरामखोर पोरानं माझा बाप काढला! म्हणतो काय, कां उतरूं? तुझ्या बापाचं आहे का हें झाड?"

नारायणीनें वर पाहून विचारलें, "असं म्हटलंस?"

एव्हढेंसें तोंड करून राम म्हणाला, "नाहीं वहिनी, मी नाहीं म्हटलं!"

दिगंबरी ओरडूं लागली, "नाहीं म्हटलंस रे हरामजाद्या? नेत्ति साक्ष आहे—" तोंड वेंगाडून नाकींसुरानें ती म्हणूं लागली, "त्या दिवशीं छज्यावर छज्या पडल्या, त्यावेळीं–'आतां असं नाहीं करायचा वहिनी, पायां पडतों वहिनी, मेलों ग मेलों वहिनी,'—असं म्हणत होतास. दाबून धरला कीं चींचीं करतो आणि सोडून दिला कीं लाथा झाडतो हरामजादा!"

रामला तें सहन करवलें नाहीं. त्याच्या हातांत एक भलामोठा कच्चा पेरू होता, तो त्यानें थाड्कन फेंकून मारला, पण तो कांहीं दिगंबरीला लागला नाहीं—नारायणीच्या डाव्या भुंवईवर सडकून जोरानें बसला. तिच्या डोळ्यांपुढें काळोखी आली आणि ती तिथेंच मट्कन खालीं बसली.

दिगंबरीनें भयंकर आरडाओरड सुरू केली तेव्हां नृत्यकाली हातांतलें काम टाकून धांव घेत आली. रामनें झाडावरून उडी टाकली आणि एकदम तिथून पोबारा केला.

दुपारच्या वेळीं शामलाल स्नानभोजनासाठीं आला आणि पहातो तों विलक्षण प्रकार झालेला! नारायणी निर्जीवासारखी बिछान्यावर पडली होती. तिचा डावा डोळा सुजून मिटून गेला होता, त्याच्यावर थंड पाण्याची पट्टी ठेवून नृत्यकाली हातीं पंखा घेऊन तिला वारा घालीत होती.

दिगंबरी आज दाराआड झाली नाहीं. अगदीं समोर येऊन रडत ओरडत म्हणाली, "रामनं जीव घेतला हो नारायणीचा."

शामलाल दचकला. तिच्या जवळ जाऊन त्यानें मार कितीसा लागला आहे तें पाहून घेतलें. करड्या बोलानें तो आपल्या बायकोला म्हणाला, "आज तुला शपथ घालतोंय—आजपासून जर त्याला जेवायला घालशील, कधींकाळीं त्याच्याशीं भाषण करशील, कधीं त्याच्या भानगडींत पडशील तर तुला माझ्या गळ्याची शपथ आहे."

नारायणी थरथरून शहारली आणि म्हणाली, "उगी रहा—उगी रहा—असलं कांहीं बोलूं नका."

शामलाल म्हणाला, "माझी ही एव्हढी मोठी शपथ मोडलीस तर माझं मेलेलं मढंच पहावं लागेल तुला!" असें म्हणून तो स्वतःच डॉक्टरला बोलवायला निघाला.

सारा दिवस राम नदीच्या कांठाकांठानें हिंडत होता, बसत होता, उभा रहात होता.—अशक्य कल्पना मनांत आणून राम संध्याकाळीं काळोख पडल्यावर चोरट्या पावलानें घरांत आला. येऊन पहातो तों पडवींत आंत घराच्या मधोमध कळकीच्या खुटांचें कुंपण घातलेलें त्याला दिसलें. त्यानें कुंपण हालवून हालवून पाहिलें, पण तें अगदीं मजबूत होतें, मोडण्याजोगें नव्हतें.

सैंपाकघरांत दिवा तेवत होता. हळूच त्यानें डोकावून आंत पाहिलें. तिथेंही हीच व्यवस्था केली होती. आंत कुणीच नव्हतें. पितळकाशाचीं भांडीं तिथेंच जमिनीवर पडलेलीं होतीं. हा प्रकार काय आहे याचा त्याला नीटसा उलगडा होईना. सकाळीं झालेल्या एकंदर भानगडीचा या नव्या व्यवस्थेशीं कांहींतरी संबंध आहे असा अंदाज मनांत येऊन त्याचें काळीज करपून गेलें.

तो तिथून उठला आणि मुकाट्यानें आपल्या खोलींत बसून पलीकडच्या भागांत काय चाललें असावें याचा कानोसा घेत बसला.

येतांना त्याला अतिशय भूक लागली होती पण आतां त्याला ती दादसुद्धां नव्हती. त्यावेळीं रात्रींचे नऊ वाजले असावे. एक चक्कर घेऊन तो खिडकीच्या दरवाजापाशीं आला आणि त्यानें दार ठोठावलें. दार उघडून नृत्यकाली सरकून बाजूला उभी राहिली.

रामनें विचारलें, " वहिनी कुठंय नेत्ति ? "

" आपल्या खोलींत झोंपलीय. "

राम खोलींत गेला. पहातो तों वहिनी खाटेवर झोंपी गेली होती आणि खालीं जमिनीवर चटई आंथरून दिगंबरी आपल्या धाकट्या मुलीला घेऊन बसली होती. गोविंद तिथेंच खेळत होता, त्यानें धांवत येऊन काकाचा हात धरला आणि लोंबकण घेत तो म्हणाला, " तुझं घर तिकडे आहे काका. इकडे आहे हें आमचं घर. बाबा म्हणत होते, कीं तूं या खोलींत पाय टाकलास तर तुझी तंगडी मोडून टाकीन."

राम खाटेवर नारायणीच्या पायथ्यागत जाऊन बसला, त्यासरशीं तिनें आपले पाय ओढून घेतले. राम मुकाट्यानें बसून राहिला होता.

दिगंबरी आपल्या छोट्या मुलीला डिंवचून म्हणाली, " सुरू, तुझे दादाबाबू याला काय म्हणत होते तें सांग ना."

सुरधुनी पाठ केलेलें भाषण म्हटल्यागत बोलूं लागली, " दादाबाबू म्हणाले, तूं इथं यायचं नाहीं. उद्यां सकाळीं सारी—काय आई ? "

दिगंबरी म्हणाली, " इस्टेट. "

सुरधुनी म्हणाली, "—इस्टेट उद्यां वांटणी करून देऊं. "

दिगंबरी म्हणाली, " शपथ कशी घातली तें सांग ना गाढवी ! "

सुरधुनी म्हणाली, " दादाबाबूंनीं अक्काला शपथ घातलीय— जेवायला वाढायचं नाहीं, भाषण करायचं नाहीं—दादाबाबू म्हणाले—म्हणाले—"

नारायणी बिछान्यावर पडल्यापडल्या तिला धमकावून म्हणाली, " छान झालं-पुरे झालं-आतां गप् बैस. "

त्यावेळीं दिगंबरी म्हणाली, " हें सारं खरं आहे बाळ. तूं माणसाचा अर्धामुर्धा जीव घेऊं लागलास तर त्यांनीं शपथ घालूं नये तर काय करावं ? मी तर बाबा त्यांना मुळींच दोष द्यायची नाहीं—मग कुणी काय हवं तें बोला ! यापुढ या घरीं तुझं जेवणखाण, येणंजाणं होतां कामा नये. नवऱ्याच्या गळ्याची शपथ पाळली पाहिजे ना तिला ! "

सुरधुनी म्हणाली, " आई, जेवायला वाढ ना. "

दिगंबरी तिला दटावून म्हणाली, " जरा थांब पोरी ! "

हा वेळपर्यंत राम तिथेंच बसला होता. अशा परिस्थितींत घरादाराला आग लागली असती तरीही तो उठला नसता. रामच्या हृदयांत दडपलेली रडण्याची उकळी वर उसळी मारून येत होती. पण सकाळच्या वेळीं दिगंबरीनें टाकून बोलतांना त्याला जें तोंड वेंगाडून दाखविलें होतें, ती आठवण दगडासारखी त्याच्या हृदयावर येऊन पडल्यामुळें त्या रडण्याच्या उकळीचा मार्ग मोकळा होत नव्हता. त्याच्यानें एकवार रडवेना, कीं ' यापुढं असं करायचा नाहीं वहिनी !' असेंहि म्हणवेना. त्या एकाच वाक्याच्या जोरावर आजपर्यंत त्यानें मोठमोठ्या संकटांतून स्वतःचा बचाव करून घेतला होता, पण आज तें सुद्धां उच्चारतां न आल्यामुळें त्याचा श्वास कोंडत येऊं लागला होता.

इतक्यांत नारायणी थकल्या आवाजानें म्हणाली, " सुरू, त्याला जायला सांग पाहूं. "

रडण्याची उकळी गिळून टाकून तो बोलूं लागला, " त्याला जायला सांग म्हणे ! आम्हांला भूक नाहीं लागत वाटतं ? केव्हांचा जेवलोंय ! "

नारायणी थोडीशी चिडीला येऊन म्हणाली, " एकदांचा खून कां केला नाहींस माझा ? मग जेवला असतांस दहा हातांनीं ! मला नाहीं माहित–जा तिकडे नेत्तीला सांग. "

" मी नेत्तीकडे नाहीं जाणार. कुणाकडेही नाहीं जाणार. कांहींसुद्धां न खातां मी उपास करीत इथं निजून राहणार—" बोलतबोलत राम दणदण पाय आपटीत सारें घर दणाणून सोडीत आपल्या खोलींत जाऊन निजला.

थोडेसे खाण्याचे जिन्नस घेऊन नृत्यकाली आली आणि म्हणाली, " उठा छोटेबाबू, एव्हढं खाऊन घ्या. "

राम चवताळून ओरडत म्हणाला, " दूर हो काळतोंडे, दूर हो. "

खाण्याचे जिन्नस तिथेंच ठेवून नृत्यकाली निघून गेली, त्याबरोबर रामनें थाळीवाटी आंगणांत ठणठणत फेंकून दिली.

सकाळीं शामलाल आपल्या नोकरीवर गेला असें पाहून राम आपल्या ओटीवर येरझाऱ्या घालीत गर्जूं लागला,—" मी नाहीं मानीत शपथ कुणाची. अं: ! मोठीच शपथ कीं नाहीं यांची ! कोण हे असे शपथ घालणारे ! हा काय माझा सख्खा भाऊ आहे ! जे माझे कुणी नव्हत त्यांचं सांगणं मी कां ऐकूं ? मी काय तिला मारायला गेलों होतों ? त्या थेरड्या जखणीला मारलं–तें नुसतं लागलं वहिनीला. मग त्याच्यासाटीं एवढ्या शपथा कशाला घालायला हव्यात ? "

त्याच्या या बडबडीकडे कुणी लक्ष देत नव्हतें. थोड्या वेळानें त्याच्या बोलण्याचा सूर बदलला. तो बोलत होता,| " टीक आहे ! छान झालं ! न कां बोलेनात, न कां जेवायला वाढीनात–मी मजेमजेनं सैंपाक करीन–भात, डाळ, छान छान भाज्या, मासे–एकटाच बसून पोटभर खाईन. काय अडणार आहे माझं ? "

याही उद्गारांना कुणी उत्तर दिलं नाहीं त्यावेळीं तो सैंपाकघरांत गेला आणि खणखण ठणठण आवाज करीत थाळी, वाट्या, तांब्या, भांडीं उलथून पालथून पहात कामाला लागला. हांका मारमारून त्यानें भोलाला बोलावून घेऊन डाळ तांदूळ धुण्यास आणि भाजी चिरून देण्यास सांगितलें. नृत्यकालीनें सारे जिन्नस आधींच आणून सैंपाकघरांत ठेवले होते.

त्यानें भोल्याला हुकूम सोडला, "तूं माझा नोकर आहेस, त्या घरीं जायचं नाहीं. त्या घरचं कुणी इकडे आलं तर त्याची तंगडी मोडून टाक. कळलं भोला? ती नेत्ति एकदां येऊं दे तर या बाजूला!"

सैंपाकघराच्या ओटीवर बसून नारायणी निमुटपणें सारें ऐकत होती. दिगंबरीची जिज्ञासा जागी झाली होती. मधें घातलेल्या बेड्याच्या फटींतून ती मधून मधून पहात होती.

थोड्या वेळानें ती आपल्या मोठ्या मुलीपाशीं आली आणि हंसू आवरीत कुजबुजत म्हणाली, "अहाहा! काय या पोराची अक्कल! आतां हा स्वतः भातभाजी रांधून जेवणार म्हणे! एका पितळेच्या हंडींत एक माप तांदूळ घालून आधण ठेवलंय त्यानं. त्यांत पाणी टाकलंय एक थेंबभर. जेवणार आहे एक अन् सैंपाक होतोय दहा जणांचा. अन् तो शिजणार तरी कसा? जळून कोळसे होतील ना त्याचे! एव्हढ्याशा छोट्या हंडींत काय एव्हढ्या तांदळाचा भात ठेवायचा?—अन् एव्हढ्याशा पाण्यानं का तो शिजणार? अन् सैंपाक करायचा दिमाख केव्हढा पहा मेल्याचा! आम्हीसुद्धां सैंपाक करतों, पण असा कांहीं दिमाख मिरवीत नाहीं. जेव्हढे तांदूळ टाकायचे तेव्हढ्या मानानं आंत पाणी टाकलं कीं पुन्हां पहायला सुद्धां नको तिकडे—डोळे झांकून बसायचं अन् भात उतरून घ्यायचा. ये तर म्हणावं माझ्या जोडीला सैंपाक करायला! जेवणारांनींच ठरवावं कीं कुणाचा सैंपाक चांगला तो!"

नारायणी तोंड फिरवून राहिली होती.

नेत्ति जवळच होती ती म्हणाली, "आजीबाईचं भलतंच कांहीं तरी! बिचाऱ्यानं एक तांब्या पाणी तरी भरून घेतलं होतं का कधीं प्यायला, तो आज स्वतः सैंपाक करून जेवणार आहे?"

या घरची ती फार जुनी मोलकरीण असल्यामुळें हे सारे प्रकार तिला मुळींच आवडले नव्हते.

आईच्या अनुकरणानें सुरधुनी देखील मधूनमधून जाऊन बेड्याच्या फटींतून पहात होती. एक घटकाभऱ्यानें ती धांवतच आली आणि आपल्या अक्काचा हात धरून तिला ओढीतओढीत म्हणाली, "चल अक्का, आधीं

पहा तर खरं. रामदादा—अग आईग ! कच्चा भात नुसताच खातोय. दुसरं कांहीं सुद्धां नाहीं बरोबर. नुसता कोरडाच भात खातोय अक्का ! कच्चा भात खाल्ला तर पोटांत दुखायचं नाहीं का ग अक्का ? ”

नारायणीनें तिचा हात सोडवून घेतला आणि ती तशीच जाऊन बिछान्यावर पडली. नुसत्या भुकेच्या आगीमुळें तो तें तसलें अन्न खात होता. किती कष्ट होता असतील त्याला, याची कल्पना तिला आल्यावांचून राहिली नाहीं.

दुपारीं शामलालचें जेवण उरकलें त्यावेळीं दिगंबरी हांका मारीत बसली होती, “ कसेबसे दोन घांस खाऊन घे पाहूं नारायणी. तो नुसता जखमेचा ताप आहे, अशा तापांत जेवलं तरी चालतं. मी सांगतें तुला, कांहीं बाधायचं नाहीं.”

पासोडी आंगभर ओढून घेऊन पडल्यापडल्याच नारायणी म्हणाली, “ उगीच मला त्रास देऊं नकोस आई. तुम्ही घ्या जेवून. ”

दिगंबरी म्हणाली, “ भात नको असेल तर दोन चपात्या करून देतें—नाहींतर—”

नारायणी म्हणाली, “ नको—मला कांहींसुद्धां नको. ”

दिगंबरी अचंबून म्हणाली, “ हें काय ग बोलणं तुझं ? कालपासून उपासपोटीं आहेस, आजसुद्धां दोन घांस खाल्ले नाहींस तर कसं निभेल ! ”

नारायणी यावर कांहीं बोलली नाहीं. तितक्यांत नृत्यकाली आली आणि म्हणाली, “ तुम्ही उगीच कशाला बडबडून जीव टाकतांहां आजीबाई ? सारा दिवस इथं उभं राहून ओरडलांत तरीसुद्धां ती कांहीं खायची नाहीं. ताप आला आहे, तिला जरा स्वस्थ निजूं द्या. ”

दिगंबरी चालती झाली. जातांजातां ती बोलत होती, “ मला काय कळतंय म्हणा ! कुठं लागलं तर ताप येतो—नाहीं असं नाहीं—पण म्हणून काय माणूस उपास करून पडून राहतं ? आम्हांला नाहीं बाई हें झेपायचं. ”

तिसऱ्या प्रहरीं नारायणी पुन्हां सैंपाकघराच्या ओटीवर येऊन बसली होती. जेव्हां जेव्हां नेत्तीची आणि तिची नजरानजर होई तेव्हां तेव्हां तिला कांहींतरी बोलावेंसें वाटे, पण ती लगेच गप्प बसे.

रामनें शाळेंतून आल्यावर हातपाय धुवून घेतले आणि दुकानावरून चणेकुरमुरे विकत आणले. ते खातखात तो आवाज चढवून म्हणाला, “ काय

अडलं माझं ? चांगला जेवून शाळेंत गेलों. आतां हा आलों तो पहा कसा खात बसलोंय ! "

बेड्याच्या पलीकडे सारीं माणसें होतीं हें त्याला माहित होतें. पण सकाळच्याप्रमाणें याहीवेळीं कुणी आपल्या शब्दाला शब्द देत नाहीं असें पाहून तो अधिकच अस्वस्थ झाला. तो ओरडून म्हणाला, " या बाजूला ही हद्द. त्या नेत्तीला म्हणावं, एकदां ये तर खरी या बाजूला, तंगडीच मोडून घालतों तिची !"

तंगडी मोडून घालण्याची ही धमकी त्यानें यापूर्वीही दिली होती. तेव्हांही तिचा कांहीं परिणाम झाला नव्हता, आतांही झाला नाहीं. आपल्या धमकीला कुणी घाबरलें आहे कीं नाहीं हेंच त्याला कळेना.

संध्याकाळीं त्यानें सांजवात केली. सैंपाकघरांत जाऊन तो पुन्हां आरडा-ओरडा करूं लागला, " माझं सर्पण कुठं आहे ? आतां कसा रांधूं मी ? माझा पाटावरवंटा कुठंय ? मी आतां वाटूं कशावर ?–"

पलीकडच्या खोलींतून नेत्ति म्हणाली, " बाई सांगताहेत, कीं उद्यां पाटावरवंटा विकत आणून देईन. "

" मला नको तो विकत आणलेला पाटावरवंटा. मला नको ! " असें म्हणून तो रडतरडत खोलीबाहेर गेला.

थोड्या वेळानें तो पुन्हां आला आणि म्हणाला, " माझ्या गणेशाला कां धरलं ? त्या थेरडीनं तोंड वेंगाडून दाखवून कां मला चिडवलं ? छान झालं ! चांगल्या शिव्या घातल्या तिला ! आतां ती मेली कीं हडळ होईल पुढल्या जन्मीं."

दिगंबरी डोळे गरगरावीत म्हणाली, " ऐकलंस नारायणी, ऐकलंस ? मुद्दाम अंगावर पाय देऊन भांडण उकरून काढणं नव्हे का हें ? "

नारायणी निमुटपणें जशी दुसऱ्याच बाजूला पहात होती तशीच पहात राहिली.

: ५ :

दुसऱ्या दिवसापासून रामची भाषा बदलली. पुरे दोन दिवस निघून गेले होते—वहिनीची हांक आली नाहीं, तिनें तोंड टाकलें नाहीं, खायला दिलें नाहीं–त्याच्या उभ्या आठवणींत असें कांहीं घडलें नव्हतें.

आज खरोखरच तो घाबरला होता. पहिल्यानें सैंपाकघराच्या उंबरठ्यावर बसून तो उलट्यासुलट्या कैफियती देत होता. एकदां म्हणत होता, मांजरावर पेरू फेंकला, एकदां म्हणत होता, हाताचा झोक चुकून पेरू वहिनीच्या कपाळाला लागला; एकदां म्हणत होता, कच्चे पेरू काढून फेंकीत होतों; त्यानंतर तो पुन्हां एकदां म्हणाला, कुणालाच शिव्या दिल्या नाहींत मी; एकदां म्हणाला, शिव्या दिल्या त्या गोविंदला; एकदां म्हणाला, भोल्याला शिव्या दिल्या. पण कुठल्याही कैफियतीचा कांहींच परिणाम झाला नाहीं. पलीकडून कुणीही जबाब देईना, वर्दळीला येईना, हो ना कांहींच कुणी बोलेना.

सारी लाजशरम बाजूला टाकून एकदां जिवाचा धडा करून त्यानें, " आतां यानंतर असं करणार नाहीं. " असें देखील म्हणून टाकलें. पण त्याचा देखील जेव्हां कांहीं उपयोग झाला नाहीं तेव्हां तो मुकाट्यानें रडूं लागला.

कोणत्या उपायानें, कशा प्रकारें वहिनीची मर्जी पुन्हां प्रसन्न करावी? वहिनीनें जर आपल्याला वेगळा ठेवला तर जेवायचें कुणाच्या हातून? कुणाजवळ कसें राह्यचें आतां? कोणत्याही बाजूला पाहिलें तरी त्याला आधाराला जागा कुठेंच दिसेना. आज त्यानें सैंपाक करायचा प्रयत्न सुद्धां केला नाहीं. तो शाळेलाही गेला नाहीं. आपल्या खोलींत तो स्वस्थ पडून राहिला होता.

चोरून रडत राहिल्यामुळें गेल्या रात्रीपासून नारायणीला पुन्हां ताप येऊं लागला होता. दुपारच्यावेळीं दिगंबरी एक वाटी दूध घेऊन आली आणि म्हणाली, " कसंबसं एव्हढं हें घेच. कांहीं न खातां मरायचंय का तुला? "

तिला उलटून उत्तर न देतां नारायणीनें दुधाची वाटी घेऊन तोंडाला लावली आणि त्यांतील घोंटभर दूध घेऊन वाटी खालीं ठेऊन ती पाठ फिरवून निजली. सारखें ' नाहीं नाहीं ' म्हणत तोडून टाकणें तिच्या जिवावर आलें होतें.

रात्रींचे नऊ वाजायला झाले होते. नृत्यकाली आली आणि हळूच तिच्या कानाला लागून म्हणाली, " छोटेबाबूंची कांहींच चाहूल लागत नाहीं आई. रात्र तर ही अशी झालेली! "

नारायणी एकदम उठून बसून रडूं लागली. ती म्हणाली, " माझी बाई ती! एकदां जाऊन तो आपल्या खोलींत आहे कीं नाहीं तें पाहून ये जा. "

ग्रंथ संग्रहालय, 
अनुक्रम ........
दि. ता. ... ..........
नों. दि. .. ....
वाचनालय शाखा

नेत्तीचे डोळे ओले झाले. हातानें डोळे पुसून ती म्हणाली, "मला जायला धीर होत नाहीं बाई !"

बाहेर जाऊन ती भोलाला घेऊन आली. भोलानें खबर दिली, "दादाठाकूर खोलींत आहेत–झोंपलेयत !"

कांहीं न बोलतां नारायणीनें दोन्हीं हात जोडून मस्तकाला लावले आणि पासोडी ओढून ती पुन्हां झोंपी गेली.

दुसऱ्या दिवशीं पहांटेच्या पूर्वींच आंघोळ करून घेऊन ती सैंपाकाला लागली. तिचा सैंपाक अर्धामुर्धा होत आला होता अशा वेळीं दिगंबरी बिछान्यांतून उठून जी बाहेर आली ती हा प्रकार पाहून आश्चर्यचकीत झाली. तिनें रागारागानें विचारलें, "तुला ताप आला होता ना नारायणी ? तीन दिवस कांहीं खाल्लं नव्हतंस ना तूं ? भल्या पहांटे उठून आंग धुवून येऊन हें काय चालवलेंयस तूं, तें मी विचारतेंय म्हटलं."

नारायणीनें अगदीं स्वाभाविकपणें उत्तर दिलें, "रांधतेंय. दिसतंय ना ?"

"दिसतंय खरं, पण तें कां ? कशासाटीं तें सांग ना ? माझ्या हातचं खायचं नाहीं का तुला ?"

कांहीं सुद्धां उत्तर न देतां नारायणी आपलें काम करीत होती.

काल सारा दिवस रामला एकच प्रश्न सारखा जाणवत होता—वहिनीला कितीसें लागलें असावें ! एक मोठा कच्चा पेरू घेऊन तो पुन्हां पुन्हां कपाळावर मारून घेऊन पहात होता; तो कितीसा लागतो याचा अंदाज घेत होता. शेवटीं त्याच्यापुढें आणखी एक प्रश्न उभा राहिला. आपल्या हातून घडलेला हा गुन्हा कशा प्रकारें निस्तरला जाईल ?

विचार करतांकरतां त्याला असें आठवलें, कीं कांहीं दिवसांपूर्वीं त्यानें इथें राहूं नये, असेंच कांहींतरी वहिनी म्हणाली होती. त्यानें ठरवलें, कीं आपण कुठेंतरी निघून गेलों, कीं वहिनी खूप होईल. त्याच्या मामाचें घर तारकेश्वरच्या बाजूला कुठेंतरी होतें. पण तें नक्की कुठें होतें हें त्याला माहित नव्हतें. त्याला वाटलें, तिकडे गेल्यावर चौकशी करतां येईल. त्यानें मनाचा निश्चय केला आणि एक लहानशी मोटली बांधून घेऊन तो उजाडण्याची वाट पहात बसून राहिला.

नारायणीचा सैंपाक तयार झाला होता. एका थाळींत ती सारे जिन्नस वाढून घेत होती. दाराशीं येऊन भोलानें हांक मारली, " बाई ! "

नारायणीनें मागें वळून पाहून म्हटलें, " काय रे भोला ? "

गेले दोन दिवस तो गुरें चारायला बाहेर घेऊन जात असे खरा, पण-रामच्या भीतीनें आंत येत नसे. तो हळूच म्हणाला, " तुमच्या कानांत कांहीं सांगायचं आहे वहिनी. "

नारायणी जवळ आली तेव्हां भोलानें कुजबुजून सांगितलें, " तुम्ही जें सांगितलं होतं वहिनी, तसंच होऊन जाईल. दोन रुपये द्यायला हवेत. "

नारायणीला तें नीटसें कळेना. ती म्हणाली, " तसंच काय होईल रे ? कुणाला रुपये द्यायला हवेत ? "

भोला जरासा आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " दादाठाकूरला इथून जायला सांगितलं होतं ना ? ते जायला राजी आहेत.-बरं, दोन रुपये द्यायचे नसले तर एक रुपया द्या. "

नारायणी कळवळून म्हणाली, " कुठं जायला राजी आहे रे तो ? कुठंय तो ? "

भोला म्हणाला, " बाहेर उभे आहेत झाडाखालीं. तिकडे कुठं त्यांच्या मामाचं घर आहे ना, देवाच्या देवळाजवळ—तिकडे—"

" जा भोला, आधीं लौकर घेऊन ये त्याला. म्हणावं, मी बोलावलंय. "

भोला धांवतपळत गेला. नारायणी काष्ट होऊन उभी राहिली होती. थोड्या वेळानें राम हातीं एक मोटली घेऊन आला. तो येऊन समोर उभा राहातांक्षणींच नारायणीनें एक शब्द सुद्धां न बोलतां त्याला ओढून खोलींत नेलें.

राम सैंपाकघरांत जात आहे असें दिगंबरीनें पाहिलें तेव्हां साशंक होऊन ती घाईघाईनें आंत आली. वाढलेलें ताट समोर होतें. रामला जवळ घेऊन नारायणी बसली होती. रामनें तिच्या कुशींत तोंड खुपसलें होतें आणि तिच्या डोळ्यांतून पाझरणारीं आंसवें रामच्या पाठीवर झिरपत होतीं.

कांहीं वेळपर्यंत ती थक्क होऊन पहात राहिली होती. नंतर ती म्हणाली, " अस्सं ! तरीच हा सैंपाकाचा एव्हढा खटाटोप होय ? भरवायचंय वाटतं ? माझ्या जांवयानं एव्हढी मोठी शपथ घातली ती वाऱ्यावर उडून गेली वाटतं ?"

नारायणी वर पाहून म्हणाली, “ उडून कशाला जाईल ? त्यांचा शब्द कसा मोडीन मी ? तीन दिवस कांहीं खाल्लं नाहीं, खायचंही नव्हतं मला. ”

दिगंबरीनें दरडावून विचारलें, “ शब्द मोडला नाहींस तर हें काय चाललंय ? ज्यानं शपथ घातली त्याचा एकदां हुकूम तरी घ्यायचा ! ”

नारायणीला तो फटका जणूं काय चांगलाच जाणवला. ती एकाच शब्दांत म्हणाली, “ हुकूम घेतलाय मी. ”

दिगंबरीला तें खरें वाटलें नाहीं. अधिकच रागाला येऊन ती म्हणाली, “ कच्ची पोर नाहीं मी नारायणी. तुला हुकूम मिळाला तें मला कसं कळलं नाहीं ? ”

आतां मात्र नारायणीला तें असह्य झालें. तीही तिला दरडावून म्हणाली, “ कुणाकडून मी कसा हुकूम मिळवला हें तुला कसं कळणार आई ? ज्याला तोंड आहे तो जशी शपथ घालतो तशीच— ” असें म्हणून तिनें मायेच्या उमाळ्यानें शरमेनें ओसरलेलें रामचें तोंड आपल्या हृदयाशीं कवटाळून धरलें. त्याच्या ललाटाचें एक चुंबन घेऊन ती म्हणाली, “ हृदयाशीं कवटाळून ज्याला कुणाला लहानाचा मोठा करायचा असतो, त्यालाच हुकूम कुठून कसा मिळवायचा तें चांगलं कळत असतं. त्याची तुला काळजी नको आई. आतां माझ्यासमोर उभी राहूं नको. इथून जा पाहूं. याला दोन घांस भरवतें. तीन दिवस उपाशी आहे माझा बाळ— ” बोलतांबोलतां पुन्हां तिच्या डोळ्यांवाटे आंसवांची झरणी सुरू झाली.

क्षणभर थांबून दिगंबरी म्हणाली, “ तर मग आतां कशाला राह्यचं मी इथं ? आतां मी या घरीं राहणं शक्य नाहीं हें तुला आज स्पष्ट सांगून टाकतें. ”

नारायणी म्हणाली, “ मी सुद्धां हीच गोष्ट तुला सांगणार होतें. पण तोंड उघडून बोलणं मला कठीण गेलं आई. खरोखरीच आतां तुम्हीं इथं राहणं बरं नव्हे. तुम्हां सर्वांच्या डोळ्यांसमोर माझं हें एवढं मोठं लेंकरू अर्धमेलं होऊन गेलं आहे. तो व्रात्य असो कीं कसाही असो, माझ्या घरीं माझ्या नजरेसमोर दुसऱ्या कुणी त्याला शिक्षा लावलेली मला सहन व्हायची नाहीं. आजचा दिवस इथं रहा

हवी तर–पण उद्यां आपल्या गांवीं जा. तुमच्या भरणपोषणाची सारी व्यवस्था मी करीन. मीच इकडून पैसे पाठवीन–पण यापुढं तूं इथं राहातां कामा नये.”

दिगंबरी सुन्न झाली. कांहींवेळ वाट पाहून ती तशीच हळूहळू बाहेर निघून गेली. कुशींत तोंड खुपसलेला राम हळूच म्हणाला, “ नको वहिनी. राहूं दे त्यांना. मी आतां सज्जन झालोंय, मला सुबुद्धि आलीय–आणखी एकदां पहा तर खरं. ”

नारायणीनें पुन्हां एकदां त्याच्या हनुवटीखालीं हात घालून वर तोंड उचलून पाहिलें. त्याच्या ललाटाला क्षणभर आपले ओंठ टेंकून डोळ्यांत येत असलेल्या आंसवांच्या गहिवरांत ती हळूच हंसून म्हणाली, “ आधीं तूं घांसभर जेव तर खरा ! ”

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
ठा. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय ठाणे
5630
IRBK-0105630
IRBK-0105630

प्रकाशक : वामन विष्णु भट, अभिनव प्रकाशन,
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड, परळ, मुंबई १२.
मुद्रक : ग. द. पराडकर, आनंद मुद्रणालय,
६, मुगभाट स्ट्रीट, खाडिलकर रोड, मुंबई ४.